
छात्र
# प्रबोधन

सौर फाल्गुन शके १९२०
वर्ष ७ अंक ८




ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी
अभिनव मासिक!

# तुम्हीच 'छात्र प्रबोधन' चा एक अंक तयार करा!

मित्रांनो, छात्र प्रबोधनचा सातव्या वर्षातला पाचवा अंक पूर्णतः विद्यार्थ्यांनी तयार केलेला अंक होता. अगदी चित्रेसुद्धा मुलांनी काढली होती. तो अंक मुलांना तर आवडलाच, पण मोठ्यांनीही त्याचे कौतुक केले. त्या अंकातील लेखनासाठी विद्यार्थ्यांचा प्रतिसादही खूपच उत्साहदायी होता. म्हणून तुमच्यातील प्रतिभागुणांना वाव देण्यासाठी, अजून एक सुवर्णसंधी! वर्ष ७ अंक११ हाही पूर्णतः विद्यार्थ्यांनी, विद्यार्थ्यांसाठी केलेला अंक असेल. अंकातील सर्व लेखन तुमचे, मुखपृष्ठही तुमचे, चित्रेही तुमचीच, फक्त संपादन केवळ आमचे. मग तुमचे लेखन ३० एप्रिलपूर्वी आमच्याकडे पाठवताय ना? लेखनाविषयी काही मार्गदर्शक सूचना पुढे देत आहोत.

---

१) **कथा** - कोणत्याही विषयावर सुमारे ५०० ते १००० शब्दांपर्यंत कथा लिहून आमच्याकडे पाठवा.

२) **नाटुकले** - एखाद्या चांगल्या कथेचे एकांकिकेत रूपांतर करून पाठवा.

३) **कविता** - तुम्हाला सुचणाऱ्या कोणत्याही विषयावर तुम्हीच तयार केलेली कविता पाठवा.

४) **मुलाखत** - तुमच्या गावातील समाजसेवक, कलाकार, उद्योजक, लेखक, गायक, राजकीय पुढारी, आदर्श व्यक्ती, शिक्षक, खेळाडू, बालकामगार, यापैकी कुणाही एका व्यक्तीची (त्या व्यक्तीच्या फोटोसहित) ५०० ते ७०० शब्दांपर्यंत, मुलाखत आमच्याकडे पाठवावी.

५) **वाचलेच पाहिजे असे काही** - पुढील ५ पैकी तुम्हाला आवडणाऱ्या कोणत्याही एका पुस्तकाचे रसग्रहण आमच्याकडे ३०० ते ५०० शब्दांत पाठवा!

अ) श्यामची आई - साने गुरुजी
ब) गणगोत - पु. ल. देशपांडे
क) कार्यरत - अनिल अवचट
ड) झाडाझडती - विश्वास पाटील
इ) प्रेषित - जयंत नारळीकर

६) वर्ष ७ अंक ७ मधील **'भाव एक छटा अनेक'** या लेखात हास्याचे विविध प्रकारे वर्णन आहे. आनंद, दुःख, निराशा, भीती, राग यापैकी कोणताही एक भाव निवडून त्याच्या जास्तीत जास्त छटा व्यक्त करणारी वाक्ये एकत्र करून पाठवा.

७) **खालील विषयांवर ५०० ते ७५० शब्दांपर्यंत ललित लेख पाठवा -**

अ) अशा क्षणी एकाकी वाटतं!
ब) असे माझे मित्र!
क) मी अनुभवलेला पाऊस!
ड) मला पडलेले स्वप्न

८) **संस्था परिचय** - तुमच्या गावातील एखाद्या संस्थेचा अथवा ऐतिहासिक वास्तूचा ५०० शब्दांत परिचय करून द्या. (सोबत त्या संस्थेचा अथवा वास्तूचा फोटोही पाठवा.)

९) **या शिवाय इतर कृतिपर लेख, उदा.** - विज्ञान प्रयोग, कचऱ्यातून कला, निसर्गाशी मैत्री, शुभेच्छापत्र, आकाशकंदील तयार करण्याची कृती, कोडी, शब्दकोडी, शोधा पाहू, विनोद इ. ही पाठवा. वेचक वेधक, नावीन्यपूर्ण माहिती पाठवायला हरकत नाही.

लेखन पाठवताना सुवाच्य अक्षरात, आखीव (फुलस्केप) कागदावर, पुरेसा समास सोडून, एकाच बाजूला लिहून पाठवा. त्यावर स्वतःचे नाव, पत्ता, शाळा व इयत्ता लिहायला विसरू नका. आलेल्या साहित्यातून निवड करून ते अंकात छापले जाईल.

**वरील विषयांव्यतिरिक्त क्रीडा-कला- विज्ञानातील तुम्हाला सुचणाऱ्या इतर विषयांवरही लेखन पाठवायला हरकत नाही.**

१०) **छात्र प्रबोधनच्या मुखपृष्ठासाठी** - कुठल्याही प्रकारचे चित्र (जलरंगातील, स्केचपेन, पेन्सिल इ. च्या साहाय्याने अथवा कापड, काडेपेटी यांचा वापर करून) आम्हाला पाठवा. चित्र तुमचं तुम्हीचं काढायचंय. या मासिकाच्या आकाराचे तुमचे चित्र असावे.

११) **मलपृष्ठासाठी** - एखादे राष्ट्रभक्तीपर स्फूर्तिगीतही तुम्ही निवडून आमच्याकडे पाठवा.

१२) **आतील चित्रांसाठी** - अंकातील लेखाला अनुरूप चित्रे काढण्यासाठी इच्छुक असणाऱ्या पुण्यातील सभासदांनी छात्र प्रबोधनच्या कार्यालयात संपर्क साधून आपला पूर्ण पत्ता द्यावा. मे महिन्याच्या सुट्टीत आवश्यकतेनुसार या मुलांना प्रथितयश चित्रकाराच्या मार्गदर्शनाखाली चित्रे काढण्याची संधी दिली जाईल.

**मग मुलांच्या मुलांसाठीच्या अंकात तुम्हीच लेखक-कवी-कलाकार होणार ना?**

# अंतरंग

छात्र प्रबोधन
वर्ष ७ अंक ८
सौर फाल्गुन
शके १९२०


२ **संवाद** : प्रा. महेन्द्र सेठिया

३ **बाईमानूस** : प्रा. राम डिंबळे

७ **शीलं परं भूषणम्** : श्रीमती शैलजा राजे

९ **मराठी मनाच्या कोंदणातील लक्ष्मीबाई** : प्रा. मीरा पटारे

१२ **माझी चांदबिबी** : प्रा. संजीवनी बोकील

१४ **५२ व्या शतकात प्रवेश!** : दीपाली जोशी

१५ **कविता पानोपानी –**
**स्वच्छंद** : सौ. आश्लेषा महाजन
**आई** : सौ. स्वाती सामक

१६ **मी काही कॉपी करणार नाही.. आम्ही कॉपी करू देणार नाही !!** : मान्यवरांचे संदेश

१८ **प्रवास जिद्दीचा – कु.स्मिता गाटे** : मुलाखत : वर्षा तोडमल, वर्षा कुलकर्णी

२१ **मैत्री 'तुझी–माझी–आपली'** : प्रा. अनघा लवळेकर

२३ **गरम चहाची कथा** : श्री. मल्हार अरणकल्ले

२५ **परीक्षेचा बागुलबुवा** : वर्षा तोडमल

२७ **करून तर पाहा...**

२९ **मावशीचा विजय असो** : प्रा. सुहासिनी देशपांडे

३२ **गावोगावचे कार्यक्रम व एप्रिलसाठी उपक्रम**




**इवली शल्ये रुपती खुपती,**
**मात करू दे त्यांच्यावरती**
**प्रगल्भतेचे पंख लेऊनी**
**ने ज्योतिर्जगतात**

**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया
**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E., M.Ed.
शैलजा देशमुख M.A. M.Ed.
दत्ता श्री. टोळ B.A., B.COM.
विवेक पोंक्षे M.SC, B.Ed.
**मलपृष्ठावरील कविता**
प्रा. शैलजा देशमुख
**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
गिरीश सहस्त्रबुद्धे
**अक्षरजुळणी**
प्रिंट लिंग, पुणे

**संपर्क पत्ता**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ,
पुणे – ४११०३०
☎०२१२-४७७६९,४७८०९५
E-mail-jnana.jptrust@axcess.net.in

**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर १०फाल्गुन, शके १९२०
१ मार्च १९९९.
**वर्गणी भारतात**
**वार्षिक** : रु.१२५/-**द्वैवार्षिक** : रू.२४०/
**त्रैवार्षिक** : रु.३५०/-**आजीवन** :रु.२०००/
**भारताबाहेर – वार्षिक** : ३० डॉलर




## सुट्टीत 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात कामाला या !

'छात्र प्रबोधनच्या कार्यालयात मासिकाच्या कामांबरोबरच अनेक प्रकारची कामे नित्य चालू असतात. रोज २ तास किंवा त्याहून अधिक वेळ(सुट्टीतले किमान १५ दिवस ) देणे ज्यांना शक्य होईल, अशांनी जरुर या कामामध्ये सहभागी व्हा. त्यानिमित्ताने अनेक अनुभव मिळतील. नवीन शिकायला मिळेल. छात्र प्रबोधनच्या कामालाही हातभार लागेल.

इच्छुक सभासदांनी मुख्य कार्यालयाशी संपर्क साधून निश्चिती करावी, म्हणजे कामाची योजना करणे सोपे जाईल.

### आनंद वार्ता

*'सांगली जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटना' यांच्यातर्फे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेत छात्र प्रबोधन दीपावली विशेषांकाला 'उत्तेजनार्थ' पुरस्कार मिळाला!*

## संवाद

*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,*

*तुम्ही सर्वजण आता अभ्यासात दंग झाला असाल! नसलात तर व्हायला हवं...! परीक्षेपूर्वीचा एक महिना मनसोक्त अभ्यास करून, परीक्षेत उत्तम यश मिळवून दाखवायचं. पण परीक्षेतलं हे यश खरं खुरं... स्वतःचं असलं पाहिजे. कॉपी करून, भ्रष्ट नक्कल करून मिळवलेलं असता कामा नये. 'मी कॉपी करणार नाही' असा निश्चय करण्याबरोबरच 'म 'माझ्या वर्गातील इतर कोणालाही कॉपी करू देणार नाही', असंही तुम्ही ठरवलं पाहिजे.*

*असं ठरविल्याने काय होईल? कदाचित तुमचे गुण कमी होतील, तुमचे एरवी जवळचे असणारे मित्र तुमचे शत्रू होतील, दादागिरीला तोंड द्यावे लागेल; कदाचित मार खावा व द्यावाही लागेल, 'तुला इतरांचे काय करायचे आहे, तुझे तू बघ' असे संवाद ऐकावे लागतील...पण यातूनच तुम्हाला मिळेल पुढील आयुष्यात भ्रष्टाचार व दुष्टप्रवृत्तींविरूद्ध लढण्याचे बळ आणि आत्मविश्वास! मग घाबरून आणि मागे राहून कसे चालेल? एकट्याने जमले नाही तर गटाने मिळून प्रयत्न करा.*

*कॉपी न करण्यासंबंधी विविध क्षेत्रातल्या मान्यवरांचे विचार, संदेश पान क्र. १६–१७ वर दिले आहेत. ते आवर्जून वाचा. वर्गात वाचून दाखवा. सूचनाफलकांवर, फळ्यावर मोठ्या अक्षरांमध्ये लिहा. पान क्र. २१ च्या पुढे प्रत्येक पानाच्या खाली कॉपी न करण्यासंबंधीची वाक्ये लिहिली आहेत. ती ठिकठिकाणी* लिहा. 'मी कॉपी करणार नाही' अशी शपथ वर्गातल्या, शाळेतल्या सर्वांना घ्यायला लावा. लेखी शपथपत्र करून त्यावर विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या घ्या. कॉपी करणाऱ्या संभाव्य विद्यार्थ्यांना स्वतंत्र्यपणे भेटून, त्यांना सूचनावजा ताकीद द्या.

शाळेत यानिमित्ताने, कॉपी विरोधी वातावरण तयार करा. त्यासाठी वर्गशिक्षक, अन्य शिक्षक, मुख्याध्यापक, मित्र–मैत्रिणी यांची मदत घ्या. तुमचे प्रयत्न, तुम्ही केलेली धडपड अन् तुमचे अनुभव जरुर आमच्यापर्यंत पोहोचवा.परीक्षेतील उत्तम यशाबरोबरच आभियानासाठी आमच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

८ मार्च हा जागातिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने विविध लेख या अंकात वाचायला मिळतील. त्यानिमित्ताने आपल्या आईशी 'तिला कोण व्हावंसं वाटत होतं?' याबाबत बोला. निदान यापुढील काळात तिचे छंद जोपासायला, तिची काही स्वप्न साकार करायला वेळ मिळावा यासाठी तिच्या कामातला काही वाटा आपण उचलू शकू का? आपल्या तिच्याकडूनच्या बारीक–सारीक अपेक्षा कमी करू शकू का? तसं आपण करू शकलो तर निश्चित या महिला दिनाच्या निमित्ताने आपण काही कृतिरूप प्रतिसाद दिला असे होईल. तुमचे अनुभव... प्रतिसाद जरुर कळवा.

'गुढीपाडवा' म्हणजे आपल्या नवीन वर्षाची सुरुवात. आख्खं जग एकविसाव्या शतकाची भाषा बोलत असताना आपण मात्र बावन्नाव्या शतकात प्रवेश करत आहोत. तेव्हा या नवीन वर्षासाठी सर्वांना खूप खूप शुभेच्छा! येणारे संवत्सर आपणा सर्वांसाठी उत्साह घेऊन येवो; चांगले विचार मनात रुजवो; वाईट प्रवृत्तींविरुद्ध लढण्याचे सामर्थ्य देवो; हीच परमेश्वराजवळ प्रार्थना!


सुटीतल्या शिबिरांमध्ये सहभागी होताय ना! बरंय तर...

*सस्नेह तुमचा*

*महेन्द्र सेठिया*

एक किरण आला... इंद्रधनुचे रंग पेरुन गेला, कोवळ्या पावलात गतीच भान जागवून गेला।

चि. हृषिकेश कुलकर्णीकडून प्रबोधकांना हार्दिक शुभेच्छा!



**८ मार्च हा दिवस म्हणजेच 'जागतिक महिला दिन', शिक्षणाचे वारे पिऊन मुक्तपणे वावरणारी मुलगी तुम्हाला मुखपृष्ठावर भेटेल, तर मलपृष्ठावरील कवितेत तिचे मनोगत वाचायला मिळेल.**

**पण मुक्तीचे गीत गाणाऱ्या स्त्रीची खेड्यात कशी स्थिती आहे? प्रा. डिंबळे यांच्या 'बाईमानूस' या लेखातून तुम्हाला या वास्तवाचे दर्शन घडेल; तर शहरात परिस्थितीशी झगडून, मुलांना मोठं करणाऱ्या, जीवनाच्या आघाडीवर लढणाऱ्या चांदबिबी – म्हणजेच 'पारूबाई' तुम्हाला भेटतील, प्रा. संजीवनी बोकील यांच्या 'माझ्या चांदबिबि या लेखात 'मराठी मनाच्या कोंदणातील लक्ष्मीबाई' या लेखातून स्मृतीचित्रे या लक्ष्मीबाई टिळकांच्या आजरामर कलाकृतीचा परिचय करून दिला आहे, प्रा. मीरा पटारे यांनी.**

**समाजातील धोके जाणून घेऊन, शील, चारित्र्य, आंतरिक सौंदर्य यांची जपणूक किती महत्त्वाची आहे? याविषयी तुमच्याशी हितगुज करताहेत, श्रीमती शैलजा राजे 'शील परं भूषणम्।' या लेखातून. 'मुलगा–मुलगी, असा भेद मनात न आणता निकोप, शुद्ध मैत्री असायला हवी, असा कदाचित तुम्हाला नवीन वाटणारा पण आधुनिक काळाशी सुसंगत विचार प्रा. अनघा लवळेकर यांनी 'मैत्री–तुझी–माझी–आपली' या लेखात मांडला आहे. कर्तृत्वाचे पंख लेऊन 'प्रशासकीय सेवे'सारख्या वेगळ्याच क्षेत्रात, धडाधडीने काम करणाऱ्या कु. स्मिता गाटे यांच्या मुलाखतीत, तुम्हाला भविष्याचे आव्हान सापडेल.**

**स्त्रीच्या दुःखाची, धडपडीची अन् कर्तृत्वाची जाणीव करून देणारे, तसेच प्रत्यक्ष कृतीला प्रेरणा देणारे हे एक प्रकट चिंतन. जागतिक महिला दिन हे केवळ एक निमित्त!**

---

# बाईमानूस

**प्रा. राम डिंबळे**

खेड्यातील स्त्रीचे परंपरागत जिणे कसे आहे आणि ते बदलायचे तर काय करायला हवे? हे समजण्यासाठी माझ्या साक्षात अनुभवातील खेडूत स्त्रीचे हे चित्र मांडीत आहे.

खेड्यात स्त्रियांचा 'बाईमानूस' म्हणूनच उल्लेख करतात. स्त्री ही माणूसदेखील आहे, याची आठवण या शब्दामुळे तरी राहावी, म्हणूनच अशी पद्धत कोणा जाणकाराने पाडली असावी.

बायकोच्या भूमिकेतल्या स्त्रीला 'बाईल' किंवा 'बायकू' म्हणतात. पण जरा आदारार्थी बोलायचे तर बायकोचाही उल्लेख 'आमची मानसं' असा करण्याची पद्धत आहे. माणूसपणा आणि स्त्रीचा संबंध मात्र असा केवळ शब्दापुरताच. एरवी तिच्याशी वागताना सर्वांना माणूसकीचा विसर पडलेला असतो.

स्त्रियांचे हे जिणे अगदी अलिकडे काहीसे बदलू लागले आहे. अर्थात तेही काही प्रगत भागातच. महाराष्ट्राच्या दूरवरच्या अंतर्भागात आणि महाराष्ट्रापासून दूरच्या उत्तरेच्या आणि पूर्वेच्या राज्यात परिस्थिती 'जैसे थे' आहे.

ग्रामीण जीवनात शेती आणि डोंगररान यावरच सारी मदार असल्याने अर्थातच कष्ट करू शकणाऱ्या कुटुंबाचेच बरे चालू शकत असे. शेताची बांधबंदिस्ती आणि नांगरट एवढी जड कामे फक्त पुरुषांना जमतात. म्हणून फक्त एवढ्या कामी पुरुष खपत असतात. शेतीतली बाकीची सारीच कामे मात्र मुख्यतः स्त्रियांनी करायची. त्याला जमेल तशी पुरुषांची साथ. पण जमेल तशीच! शेतातील अवजड नांगरटीचं काम सोडलं, तर बाकी प्रत्येक कामाला स्त्रीचा हात लागलाच पाहिजे. पुरुष म्हणजे शेतीच्या कंपनीचा फक्त अध्यक्ष! निर्णय घेणारा...आज्ञा सोडणारा... श्रेय घेणारा. बाई म्हणजे फक्त मजूर! राबणारी, चिंता करणारी, काटकसर करणारी. खरं तर आपल्याकडे शेती चालवलीय ती स्त्रियांनी. बाई म्हणजे फक्त जेवणावारी राबणारी मजूर. एवढ्याचसाठी मुलाचं लग्न लवकर

माझे दुःख, माझे दुःख, तयघरात कोंडलं, माझे सुख, माझे सुख, हंड्याझुंबर टांगलं.

छात्र प्रबोधनच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा! 'हेजीब' सौमित्र गोसावी, पुणे

उरकून घरात फुकटातली मजूर आणण्याची खेड्यात घाई असते. पूर्वी कायद्याने एका पुरुषाला अनेक बायका करण्याची मुभा होती. या अनेक बायका म्हणजे शेतात राबायला हक्कांचे फुकट मजूर!

शेतात किंवा गोठ्यात जे पिकेल त्यातल्या शेलक्या मालावर घरातल्या पुरुषाचा हक्क पहिला असतो. दुधामधांन भरल्या घरातली पुरुष मंडळी भले दुधावर व तुपावर ताव मारोत, ते दुध घरच्या मुलीला देण्याचा प्रघात नाही कारण ते परवडतच नाही म्हणून! घरातल्या स्त्रीच्या मुखाला दूध-तूप लागण्याची सुतराम शक्यता नाही. मुळातच शेतात जे जे उत्तम पिकतं ते ते बाजाराला धाडणं आवश्यक असे. उत्तम आंबेमोहोर किंवा बासमती तांदूळ पिकवणारा शेतकरी, घरी मात्र कसला तरी साधा सुमार तांदूळ खाणार. अशा घरातील बायकामुलींना त्या सुमार अन्नातलेच दुय्यम अन्न मिळणार, हे गृहीत धरले जाते. पुरुष माणसाला गाव बैठकीत बसावे लागते. बाजारगावी वा तालुक्याच्या गावी जावे लागते. पाहुण्या-रावळ्यांकडे जावे लागते. या सर्वांमुळे त्याच्या अंगावर जरा उजवे कपडे पाहिजेत. ते मुद्दाम खरीदूनही शिवण्याची पद्धत असते. मात्र बाईमाणसाला कापडचोपड केवळ लग्नसमारंभात मिळालेले किंवा माहेराहून भाऊबीजेसारख्या निमित्तानं आलेले असेच असणार. बाईमाणसाला बाजारात हौसेनं जाऊन कापड घेण्याचा प्रसंग जवळजवळ नाहीच, म्हणजे अन्नात जसा दुय्यम वाटा तसाच वस्त्रातही. निवाऱ्याच्या अंधेऱ्या भागात, म्हणजे चुलीपाशी बाईमाणसाचा वावर असणार. ओसरीवर ऐटीत बसणार तो फक्त पुरुष.

खेडोपाडी स्त्रियांना उपलब्ध असणारी करमणूक म्हणजे गावजत्रा. त्यातही तिथला चवदार तमाशा, त्याच्या चावटपणापायी स्त्रियांनी पाहायचा नाही, अशीच प्रथा आहे. म्हणजे उरले कीर्तन. खेड्यात स्त्रियांसाठी भजनाची संधी नाही. गावच्या देवळात रात्री उशीरापर्यंत, देवाचा मोठ्या आवाजात धावा करण्याची भजनीपद्धत, फक्त पुरुषांसाठीच असते. ढोल-लेझिमीचा खेळ संपूर्ण पुरुषीच असतो.स्त्रियांसाठी मैदानी खेळ ही कल्पनाच खेडोपाडी नाही. म्हणजे झिम्माफुगडी, छप्पापाणी, झोका एवढ्यापर्यंतच ही स्त्रियांची करमणूक मर्यादित आहे. बहुसंख्य स्त्रिया निरक्षर असल्याने पुस्तक वाचनाशी त्यांचा संबंध जवळजवळ नाहीच. काही गावात देवळात पोथी-पुराण लावतात, ते ऐकायला जाण्याची संधी प्रसंगी स्त्रियांना मिळते तेवढीच. परंतु एकूण, स्त्रियांना मने नाहीत, स्वतंत्र मत नाही. त्यामुळे त्यांना कशाला हवंय मनोरंजन? असाच सारा मामला आहे.

स्त्रियांच्या आरोग्याची स्थिती याहून दुर्धर आहे. बाईमाणूस आजारी पडले असे केव्हा म्हणायचे? तर तिने अगदीच अंथरुण धरले तर ! तोवर तिने शक्यतो सगळे अंगावरच काढायचे. घरातल्या लहान मुलाच्या आजाराचे सगळ्यात जास्त कौतुक. त्यामागोमाग कर्त्या पुरुषाचं आजारपण. बाई माणूस - आणि त्यातही म्हातारी बाई औषधपाण्याला सर्वात अधिक वंचित असणार. तरुण स्त्रियांची म्हणून काही दुखणी असतात. ती त्यांना घरात कुणाला सांगता येत नाहीत. सासूला सांगावं, तर ती बहुतेक वेळा प्रतिस्पर्धी. म्हणून कुठल्याही खेड्यात जा, तिथे तरुण स्त्रियांचे आजार बहुधा दुर्लक्षित असतात. स्त्रियांचे डॉक्टर्स, असे वेगळे उपलब्ध नसतात. मुळातच खेड्यातला डॉक्टर हा सर्वज्ञ असल्यासारखा, सर्वच प्रश्नांचे उत्तर देऊ शकणारा मानला जातो. त्यालाच सर्व 'स्पेशलायझेशन्स' कळावी लागतात. त्यावर तोडगा म्हणून तो शहरातल्या 'स्पेशालिस्टां'शी संधान बांधून असतो. जे त्याला जमत नाही ते शहरात पाठवायचं. शहरात गेलेल्या गावरान दुखणकऱ्याला मुख्य प्रश्न राहण्या-जेवण्याचा असतो. सरकारी इस्पितळांच्या कॉरिडॉर्समध्ये दिवसच्या दिवस झुरत राहत, त्याच्या उपचाराची वाट पाहायची. खेड्यातल्या बाईला शहरात हॉस्पिटलमध्ये ठेवायचं, तर तिची शुश्रुषा कुणी करायची? ती बहुतेक वेळी तिच्या माहेरच्यांशी जबाबदारी असते. त्या बाईची म्हातारी आई किंवा शहरात दिलेली बहीण तिच्याजवळ थांबणार. एरवी पुरुष आजारी पडला तर मात्र त्याची सकळ शुश्रूषा घरच्या बाईनं सांभाळायची, हे ओघानं आलंच.

स्त्रीला शेतीकामातून डोकं वर

जग जग माझ्या जीवा, असं जगनं तोलाचं । उच्च गगनासारखं, धरत्रीच्या मोलाचं।

रिकाम्या नव्हे तर भरलेल्या पेल्याकडे पाहा - डॉ. दिलीप पटवर्धन, सांगली

काढण्याची संधी म्हणून नसते. कारण तिची अवस्था शहरातल्या नोकरी करून घर सांभाळणाऱ्या बाईसारखी असते. शहरी नोकरदार स्त्री, ही तिचं घर आटोपशीरच ठेवते. उगीच कुणाच्या जबाबदाऱ्या मुळात ती अंगावर येऊच देत नाही. तिचं ते आटोपशीर चौकोनी कुटुंबदेखील ती मोलकरीण, स्वयंपाकाची बाई, घरकामवाली बाई, लॉन्ड्री इ. च्या मदतीने सांभाळते. इथं खेड्यात मात्र घर मुळातच भरगच्च असतं. तिथली धुणीभांडी, स्वयंपाक, गोठापाणी सारं त्या बाईकडेच असतं. पिठाच्या गिरण्या अलीकडे आल्या. वीस वर्षापूर्वीपर्यंत घरातलं मणामणाचं दळण हे जात्यावर पहाटभर दळीत राहायचं , हे न टळणारं काम होते. भातशेतीत सगळे भात हे मुसळकांडीने बाईनंच उखळात सडायचे. एक बाई दिवसभरात मणभर भात सडून, पाखडून पुरे करी. हे काम महाचिवटपणाने रेटावं लागे. आता त्याला 'हलर्स् आल्याने हे काम उणावलं आहे. एकेका घरातले १०० मणाचे हातसडीचं काम करणारी बाई, कोणा पूर्वजन्माचे भोग या जन्मी फेडीत आहे, असंच वाटे. दळणकांडणातून केवळ विज्ञानाने स्त्रियांची सुटका केली. आजही अप्रगत अंतर्भागात हे काम स्त्रिया करीतच असतात. जेव्हा विज्ञान त्यांच्यासाठीचे तंत्रज्ञान तिथवर पोचवील, तेव्हाच त्यांची सुटका होईल.

बाईमाणसाच्या दिनक्रमात गोठा कायमचा गोवलेल असे. शेतकऱ्याक पाच-दहा गुरं नस तर तो कसली शेत करणार? या पाच-दहा गुरांची सेवा करण्यातून कुणाची सुटका नाही. गुरां गोठे झाडून त्यांचं शेण गोळा करायच अन् त्याच्या गोवऱ्या थापून, वाळवून, जळणासाठी छपराखाली रचून ठेवायच्या, हे अटळ काम होतं. गुराला पेंढी घालणे, गुरं पाण्यावर नेणं आणि दुभत्या जनावराच्या धारा काढणं, ही कामं बाई करू शकत नसेल तरच पुरुषाकडे येणार. या गुराच्या गळ्याला बांधलेल्या घुंगरासारखीच ही घरातली बाई दाव्याला कायम जखडलेली असते. गुरांच्या शेणाच्या गोवऱ्या चुलीला पुरत नाहीत. त्यासाठी लाकूडफाटा हवा. म्हणजेच डोंगरात दूरवर जाऊन फाटी तोडायची, त्यांची मोळी बांधून ती घरी आणायची अन् पावसाळ्याच्या दिवसासाठी घरात रचून ठेवायची, हे सगळं काम बाईमाणसांचंच. कालपरवापर्यंत यातून सुटका नव्हती. आता कुठे गॅसप्लँट नावाचं वरदान तुरळक ठिकाणी अवतरल्याने, चुलीत लाकूडगोवरी



[illegible]
हे जखडकाम कमी होऊ लागलं आहे. खेडोपाडी स्टोव्ह दिसू लागलेत. हीदेखील विज्ञानातीत कृपा!

खेड्यातल्या पाणगोठ्यांची गोष्ट म्हणजे निखळ अश्रूंचीच कथा! कुठे मैला दोन मैलांवर असलेली ती विहीर क्रूरपणानं बाईला जणू खिजवीत असणार! उन्हाळ्यात पाणी तळीला उतरणार. रात्री कंदील लावून विहिरीवर जायचं आणि खालीउतरून वाटी-वाटीनं हंडा भरायचा. असे दोन-तीन हंडे डुईवर घेऊन चढानं चढत ती बाई घरापर्यंत पोचली, की खुज्या चौकटीतून हंडा घेऊन जाता येत नाही म्हणून, गप्पाष्टकात रंगलेल्या बाप्यानं तो तेवढा हंडा डुईवरून उतरून ठेवायचा त्रास घ्यायचा. बाकी

असे जगावे, की जगण्याने, मरणालाही दुःख फुटावे.

सारं काम बाईचंच. या विहिरीवर जमून बाई आपलं गाऱ्हाणं दुसऱ्या बाईला सांगायची. तीही तसल्याच गाऱ्हाण्यांनी व्यापलेली, दुखऱ्या मनाची दुसरी बाई. पण तेवढाच विरंगुळा! असं मन रितं कराला कुणी जवळ नसं, की बाईच्या मनाचा कोंडमारा होई. असा कोंडलेल्या कन्यांनी मग विहिरीत बुडी घ्यायची एवढाच पर्याय राही. कित्येकदा अशा विहिरीतच ढकलून एकाकी बाईचा शेवट करणारी क्रूर घरं हरेक गावात एक-दोन तरी सापडायचीच!

आता सरकारी नळ योजना आल्यात. त्यानं बाईची ही जीवघेणी ढोर मेहनत कमी होत चालली आहे. मात्र संपलेली नाही. बाईमाणसाने घरदाराची डागडुजी, लिंपणं, सारवणं करायची हाही अलिखितच प्रघात. जुन्या गावात अशी मातीचीच घरे सर्वत्र असायची. त्यात अलीकडे विटांच्या भिंती आणि भुईला फरशी असलेली काही घरं दिसू लागलीत. तेवढीच सारवण्यातून सुटका.

खेड्यातल्या घरातील बाईनं रोजंदारीनं दुसऱ्याच्या कामाला जायचं हे निदान गरीब घरातील स्त्रीला अटळ असंत. बागायती गावातील देशमुख, जमीनदारांच्या स्त्रिया कायम घरबंद असण्यातच त्या घराची प्रतिष्ठा असल्यानं, त्या पाणी आणायला वा शेणपाणी करायलाही बाहेर न धाडण्याची प्रथा आहे. अर्थात त्यामुळे त्या आरामात लोळत असतात, असेही नाही. त्यांचा कोंडमारा आणखी वेगळ्याच थराला जाणारा.

गावातील बाईच्या नशिबात हमखास येणारा प्रसंग म्हणजे दारूबाज नवरा! व्यसनांची गरज फक्त बाप्यांनाच असते, या प्रथेत कोणतं तर्कशास्त्र आहे देव जाणे! बाईनं भाजकी तंबाखू ही दंतमंजनासारखी लावायची एवढं एकच 'मिश्री'चे व्यसन बाईला करता येतं. बाकी बाप्यानं तंबाखू खावी, विडी ओढावी, सुपारी चघळावी, भांग घोटावी आणि ताडीमाडी-दारू चढवून घरात धिंगणा घालावा, असं दृश्य सगळीकडे आहे. अपवाद फक्त माळकरी घराचा. परंतु अशी घरं थोडी. अन्य सगळी घरं सर्व व्यसने करण्यासाठी मुक्त आहेत. व्यसनांच्या थैमनाला तोंड द्यायचं ते एकट्या बाईनंच. व्यसनी पुरुषानं घरावर अंमल गाजवायचा म्हणजे नशेत आपल्या बायकोला गुरासारख झोडायचं. तिच्या माहेरघराचा सतत उद्धार करायचा. दारूपाण्यापायी तिचे दागिने मोडायचे. माहेराहून पुरवठा करायला लावायचा. थोडक्यात बाईनं मान वर करून बोलायची हिंमतच करू नये, असा तिच्या मनाचा, मानाचा, चुराचुराच करायचा.

बाईनं शेतमजुरी पलीकडचं कसलंही कसब शिकायची सोय नाही. जणू गरजही नाही. आता कुठे शिवणकाम वगैरे शिकून घरकमाईत तिने आणखी भर घालावी, असा प्रयत्न अपवादानं दिसू लागला आहे.

बाईच्या आयुष्याला शिक्षणानं उजवे दिवस येतील, असा भरवसा खेड्यातल्या घरात फारसा नाही. फक्त शिकलेल्या (म्हणजे साक्षर) मुलीला शहरातला, नोकरदार नवरा मिळेल, अशी आशा असते. नोकरदार नवरा म्हणजे खेड्याच्या बैलघाण्यातून सुटका, असं जणू समीकरणच झालं आहे. आपल्या मुली पदवीधर व्हाव्यात, (डॉक्टर, इंजिनियर, अधिकारी व्हव्यात) डॉक्टर, इंजिनियर, अधिकारी व्हव्यात, ही शक्यताच खेड्यातल्या माणसाला दिसत नाही. त्याचं मन त्याला मना करतं.'बाईच्या जातीला' हे कशाला पाहिजे? असा परंपरेनं आलेला ग्रह आडवा येतो. 'पायीची वहाण पायी बरी' असा सुज्ञ विचार खेड्यातली माणसं करीत राहतात.

नव्या कायद्यानं काही गावी पंच, सरपंच, सभापती पदावर महिला निवडल्या गेल्या आहेत. त्यांचे कारभार मात्र त्यांचे 'कारभारी'च चालवू पाहात आहेत. ज्या देशावर एका महिलेनं १७ वर्षे धडाकेबाज कारभार केला, त्या देशाच्या स्त्रीला सर्वाधिकार देण्याची तयारी अजून कशी झालेली नाही? स्वतः स्त्रियादेखील अशी उमेद बाळगून नसतात. एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला अशा अधिकाराला पात्र समजत नाही.

गावातली बाई शिलंगण करून चहू मुलखात हिंडून आली, तरच तिला जग काय आहे हे कळेल. तिच्या नशिबी असली तर वृद्धपणाची धर्मिक तीर्थयात्राच असू शकते. आधुनिक प्रगतीची तीर्थक्षेत्रे पाहायला खेडोपाडीच्या स्त्रियांना नेले पाहिजे, तरच त्यांच्यातली उमेद जागी होईल.

जुन्या काळी पुरुषांना देखील समुद्रबंदी होती म्हणे. कारण ते 'भ्रष्ट होतील अशी भीती होती. आता

फुलवात मनाला उजळुन येते तेव्हा, पाऊलात शिरावी नक्षत्रांची माया.

'' शिस्तबद्ध दिनतर्येमुळे रोजच्या आयुष्यातील ताणतणाव कमी राहतात.'' - श्री राजेन्द्र कानडे, पुणे

सातासमुद्रापार गेलेले अनिवासी भारतीयच, आपल्याला आधाराचे वाटतात, ही वस्तुस्थिती आहे. स्त्रियांनीदेखील सातासमुद्रापारची ही सप्तपदी पुरुषांपाठोपाठ केली पाहिजे. म्हणजे आमची ही खेडवळ 'बाई' खऱ्या अर्थानं 'माणूस' बनू शकेल.

**प्रा. राम डिंबळे**

१९०/७ सदाशिव पेठ, शास्त्री मार्ग, पुणे

# 'शीलं परं- भूषणम्'



-श्रीमती शैलजा राज

हल्ली वर्तमानपत्रातून ज्या जाहिराती पाहायला मिळतात, त्या पाहून कधी कधी वाटतं खरंच का आजच्या स्त्रिया अशा कपड्यात वावरतात? शाळांतून, कधीकधी कॉलेजातून फेरफटका मारला न् अंगभर नीटनेटक्या कपड्यातल्या पंजाबी, चुडीदार वेषातील मुली पाहिल्या की मन एक समाधानाचा निश्वास टाकतं.

हे असं जरी असलं तरी कधीकधी मन उद्विग्न व्हावं, अशा वार्ताही वाचायला मिळतात. परवाच 'दामिनी' या लोकप्रिय मालिकेचा भाग पाहताना, अंगावर भीतीचा शहारा आला आणि ही भीती त्या मालिकेतल्या एकट्या चंदापुरतीच नाही, तर साऱ्याच निरागस, अबोध मुलींच्या संदर्भातही होती.

दोन-तीन दिवस त्या चंदाचाच विचार मनात घोळत होता आणि मग एक गोष्ट मनानं मान्य केली. चंदावर हा प्रसंग ओढवण्यात तिचीही चूक होतीच. बारा-चौदा वर्षांची मुलगी काही अगदीच अवखळ किंवा भोळसट नसते, नसावीच. पण त्या चंदाला तो पक्या कधी माळ, कधी डूल अशा एकेक गोष्टी देत होता न् ती घेत होती. का ? कारण तिला त्या गोष्टी हव्याश्या वाटत होत्या. गरिबीमुळे तिला त्या मिळत नव्हत्या आणि हा लोभ, ही असूयाच तिच्यावरच्या अन्यायाला-बलात्काराला कारण झाली. सुरुवातीलाच त्याला 'मी हे घेणार नाही' असं झिडकारून टाकायला हवं होतं. घरात आईला हे सांगायला हवं होतं, पण तिनं तसं केलं नाही. आईशी खोटं बोलली आणि हा खोटेपणाच तिच्या अंगाशी आला.

हल्ली टी.व्ही., सिनेमा, आजूबाजूचं वातावरण या गोष्टींचा एक अनाहूत असा परिणाम मनावर, विशेषतः अबोध मनावर होत असतो. पूर्वी घरातच सेन्सॉर बोर्ड असायचं. मला आठवतंय. ऐतिहासिक, 'माझा मुलगा', 'कुंकू' सामाजिक, 'रामराज्य', 'सैरंध्री' असे पौणिक चित्रपट आले की मगच आम्हा मुलांना, आई-वडील, मामा, काका कुणीतरी न्यायचं. येताना त्यातले नेमकं मर्म काय? हे नीट समजवण्यात यायचं. शीलासाठी बलिदान केलेल्या एखाद्या पद्मिनीची कथा आई डोळ्यात पाणी आणून सांगायची. 'शेजारणीनं सरी घातली म्हणून आपण का दोरी बांधायची गळ्याला?' या म्हणीचा योग्य तो संदर्भ दिला जायचा आणि म्हणूनच हव्यास, असूया, द्वेष या गोष्टी तशा दूरच राहायच्या, तसा प्रयत्न केला जायचा.

पण आताचं चित्रच वेगळं झालयं. पूर्वीच्या अडाणी, अशिक्षित स्त्रीची जागा आता सुशिक्षित, पुरोगामी विचाराच्या आईनं घेतली आहे. आई स्वतःहोऊन मुलीसाठी खास सिनेस्टाईल कपडे आणते. चार वर्षांच्या मुलीला मॅचिंग म्हणजे काय? हे कळतही नसतं, पण आई जिवाचा आटापिटा करते, त्या मुलीच्या एकूण मॅचिंगसाठी. हे मी स्वतः पाहिलंय आणि चकित झाले.

स्त्री आणि पुरुष हा भेद पुसलाच पाहिजे हे मान्य करूनही असं म्हणावंसं वाटतं, निसर्गानंच स्त्रियांना एक आगळं वेगळेपण दिलं आहे. स्त्री हीच खरं तर खंबीर आणि सुजाण घराचा वासा असते. त्या वाशाची

*मी माझ्या हाताने लिहिल्या माळावरल्या रेषा। अन्यायाचा जाब विचारीन हीच आमूची भाषा।*

प्रायोजक - मे. ओम्. कन्स्ट्रक्शन, प्रोप्रो. माणिकराम हळबे, पुणे ३०

निगुती राखायलाच हवी. नाहीतर वाळवी लागून तो वासा कोसळला, तर अवघं घर कोसळायला क्षणही लागायचा नाही. संस्कार करायचं काम फक्त घराचं नसतं, तर अवघ्या वातावरणाचं असत. ते वातावरण निकोप असणं आवश्यक असतं. आई-मुलीत सुसंवाद असावा लागतो. आजची मुलगी पुढे अनेक नात्यानं समाजाशी जोडली जाते. हा समाज निकोप व्हायला हवा, ही भावना स्त्रीच्या मनात रुजवावी लागते, तिला योग्य ते खतपाणी घालावं लागतं; तेव्हाच सुसंस्काराचं बीज रुजलं जातं.

शिस्त, शालीनता, शीलता या त्रयींचा संगम झाला म्हणजे, एक आदर्श स्त्री निर्माण होते. अनेक मार्गांनी जग जवळ येतंय.जगातल्या अनेक बाबींची सरमिसळ होतेय, पण चांगलं न् वाईट यातला नेमका फरक समजण्याचं आकलन असणं जरुरीचं असतं आणि हे आकलन येतं ते सुसंस्कारांनी. मन आणि अंतर्मन यांचा झगडा सदोदित होत असतो, अशा वेळी सदसद्विवेक बुद्धीचा कौल मानावा लागतो. सदाचार ही फार मोठी दौलत आहे, ही गोष्ट कधीही विसरू नये. सावित्रीबाई फुले किंवा अनुताई वाघ यांची नुसती नावं घ्यायची, त्यांच्या धड्याचं परीक्षेच्या मार्कांपुरतं वाचन करायचं, हे खरं नव्हे. सीता, सावित्री या भाकडकथा नव्हेत, हे ध्यानी घ्यावं. त्यांच्या त्यागाची कथा मनी बिंबली पाहिजे. अगदी आजचंच उदाहरण घ्यायचं झालं तर साधनाताई आमट्यांचं घ्या. केवढी निष्ठा आपल्या कर्मावर आणि आपल्या जीवनयात्रीवर! रामायणातील सीताच पुन्हा या भूतलावर अवतरली असं वाटावं, असं सारं जगणं.

सजावं, चांगलं ल्यावं, छान दिसावं, अशी प्रत्येकीचीच इच्छा असते. हे असं वाटणं हे नैसर्गिक आहे. पण पूर्वीची एक फार चांगली म्हण आहे, 'अंथरुण पाहून पाय पसरावे!' किती थोड्या शब्दांत, पण किती मोठा आशय सांगते ही म्हण! आपल्याला हवं ते मिळालंच पाहिजे कसंही करून! या भावनेपेक्षा जे हवंसं वाटतं, ते मी मिळवण्याचा प्रयत्न करीन, पण सद्मार्गाने. त्यासाठी जे प्रयत्न करीन, ते सचोटीने.

सचोटी ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. अबोध, अजाण वयात काही वेळा नको त्या गोष्टी हव्या वाटतात, हे हवंहवंस वाटणारं जे आहे ना, त्याची मागणी आईजवळ करा. तिच्याशी, शिक्षकांशी, पालकांशी मैत्रिणींशीसुद्धा खरंखरं बोला. खरं बोलायला धैर्य लागंत, ते अंगी आणा.

मी आधी म्हटलं ना; त्याप्रमाणे शिस्त रोमारोमात भिनवा. केव्हा कोणती गोष्ट करायची? हे एकदा पक्कं ठरलं की सारं सुकर होतं. मधे काय तर, दोन लहान बारा-चौदा वर्षांच्या मुली घरातून पळून गेल्या, का? तर, सिनेमात काम करा, नाटकात काम करा. पण त्यासाठी जे कष्ट करायला हवेत ते करण्याची तयारी ठेवा! माधुरी दीक्षित असी हसते, म्हणून मी हसेन असं सर्वच मुलींनी म्हणून चालेल का? जे आपल्याला आपल्या एकूण परिस्थितीला झेपेल, तेच करावं! मृगजळामागं धावण्यात काय अर्थ आहे? आज तुम्ही जे शिकता आहात, ते शिक्षण घ्या! आधी हाती घेतलेलं काम पुरं करावं न् मगच दुसऱ्या कामाकडे पाहावं! एका वेळी एकाच गोष्टीचा, चांगल्या गोष्टीचा ध्यास घ्या. तुमची शाळा, तुमचे,घर तुमचे आप्तेष्ट यांना तुमचा अभिमान वाटेल, असं वागा! जग भलं आहे न् बुरंही! आपल्याला कोणतं जग जवळचं वाटतं, याचा सारासार विचार करता आला पाहिजे. तरच तुमचा निभाव या आजच्या रंगीबेरंगी जगात लागणार आहे.


आपलं घर, आपला समाज हा आपणच जगापुढे ठेवायचा असतो.चांगलं, वाईट हा निवाडा तुमचा तुम्हीच करायला हवा आणि म्हणूनच अगदी लहानपणापासून चांगले संस्कार अंगी भिनवा! चारित्र्य ही फार मौल्यवान चीज आहे. जग हे डागळवायला, दगड फेकायला असतंच, पण त्याला सामना द्यायची हिंमत तुमच्यात असायला हवी. 'आम्ही भारतीय भगिनी' असं नुसतंच उच्चरवानं म्हणण्यापेक्षा, भारतीय म्हणजे काय, हे आधी समजून घ्या! तुम्हीच उद्याच्या समाजाच्या अध्वर्यू आहात, हे विसरू नका. बाह्यरूपापेक्षा अंतर्यामी तुम्ही कशा आहात? हे महत्त्वाचं. म्हणूनच आवर्जून सांगते, 'शीलं परं भूषणम'!

---

श्रीमती शैलजा राजे
सुन्दर नगरी, ३०८ सोमवार पेठ, पुणे १

जीवनाचा नम्र असा नवा आरंभ, सौंदर्याच्या ओळीचा मी गोड प्रारंभ

निसर्गात शत्रू कोणीही नाही. प्रत्येकास काम नेमून दिलेले असते.-श्री. उदय भवाळकर अर्थवर्म, पुणे ९.  ५२६९१६



# मराठी मनाच्या कोंदणातील लक्ष्मीबाई

**प्रा. मीरा पटारे**

रेव्ह. टिळक ज्यांचे प्रेरणास्थान, ज्यांनी बालकवीसारख्या कोमल हृदयी कवीला घडविले त्या लक्ष्मीबाई टिळकांचा, दि. २४ फेब्रुवारी १९३६ हा निर्वाणदिन. या निरक्षर स्त्रीने 'स्मृतिचित्रा'सारखी अजरामर कलाकृती निर्माण केली. आजही मराठी माणूस लक्ष्मीबाईंच्या स्मृतिचित्रांवर प्रेम करतो.

लक्ष्मीबाई टिळक म्हणता क्षणी आठवते, ते त्यांची 'स्मृतिचित्रे' आत्मचरित्र कसे असावे, किती पारदर्शक असावे, याचा एक आदर्शच या आत्मचरित्राने मराठी साहित्याला घालून दिला आहे. या आदर्शाच्या शिखरापर्यंत पोहोचणारे एकही आत्मचरित्र आजही दाखविता येत नाही. हे या लेखिकेचे यश मराठी माणसाने अभिमानाने कबूल केले आहे. रेव्ह.टिळक व निर्सगकवी, बालकवी यांच्या जीवनाचा दस्तऐवज रेखाटणाऱ्या आत्मचरित्राने लक्ष्मीबाईंची विविध रूपे चिरंजीव करून ठेवली आहेत.

लक्ष्मीबाईंना नारायणराव टिळकांनी प्रेरणा दिली. प्रेमळ प्रोत्साहन दिले. अत्यंत सनातनी कर्मठ, सोवळ्या ओवळ्याच्या परंपरा जपणाऱ्या गोखल्यांच्या घरात जन्मलेल्या लक्ष्मीबाई, टिळकांच्या घरात लग्नबंधनाने आल्या नि नारायणराव टिळकांच्या सहवासात परिस्थितीशी जुळवून घेत आदर्श जीवन जगल्या. आपल्या 'स्मृतिचित्रे' या आत्मचरित्रात त्या म्हणतात, 'पण मला नवल वाटते, ते मी टिळकांना कशी पसंत पडले ह्याचे. माझे रंग, रूप अगदी बेताचेच होते. बाकी नाक, डोळे जरी रेखीव नव्हते तरी ते होते, अगदी जागच्या जागी होते.'' या त्यांच्या ओळींमधून लक्ष्मीबाईंचे साधे सरळ मन आणि विनोदी वृत्ती याची चुणूक जाणवल्यावाचून राहात नाही. त्यांच्या स्मृतिचित्रातून, गेल्या अर्धशतकातील सामाजिक इतिहास डोळ्यापुढे उभा राहतो. उत्तम लेखिका म्हणून लक्ष्मीबाईंना 'स्मृतिचित्रे' या ग्रंथाने प्रसिद्धी मिळवून दिली.

लक्ष्मीबाईंचे हे लिखाण हृदयातून उत्स्फूर्तपणे झाले असल्यामुळे त्यातील जिवंतपणा लक्षणीय आहे. आपण लिहितो ते वाचले जाईल याची त्यांना कल्पना नव्हती, म्हणूनच ते सहजपणे वाचकांच्या मनाचा वेध घेते आणि स्मृतिचित्रातील एक एक प्रसंग वाचताना लक्ष्मीबाईंच्या आयुष्याचा जीवनपट आपल्यापुढे साकार होत जातो.

कोणतेही शालेय शिक्षण न घेतलेल्या या स्त्रीने, परिस्थितीची अनुकूलता ध्यानी घेऊन, एका सुसंस्कृत आर्य, महाराष्ट्रीयन स्त्रीचा आदर्शच समाजापुढे उभा केलेला आहे. उदार, प्रेमळ वृत्तीच्या लक्ष्मीबाई, आपल्या उत्तर आयुष्यात जणू 'सार्वजनिक आजीबाई'झाल्या होत्या. आयुष्यात अनेक विचित्र परिस्थितीशी त्यांनी झुंज दिली. पण लिहिण्या-वाचण्यास न शिकलेल्या लक्ष्मीबाईंनी जणू प्रतिज्ञाच केली होती की, ज्या दिवशी मला पूर्ण विराम

आपलाच एक स्मृतिग्रंथ, मनाच्या मनी चाळीत असावे, वाहत्या पाण्यात पाय सोडून, स्वतःशी बोलत स्वस्थ बसावे.

प्रायोजक - परांजपे पोल्ट्री फार्म, दुर्गामाता मंदिरामागे, सांगली.

मिळेल, त्याच दिवशी माझ्या लेखनाला पूर्णविराम मिळेल. म्हणूनच ख्रिस्तायनाचे ७४ अध्याय आणि स्मृतिचित्रांच्या चौथ्या भागाचे अर्धेअधिक लेखन झाल्यावर त्यांनी लेखणी खाली ठेवली.

वयाच्या ११ व्या वर्षापासून, म्हणजे अगदी बालपणापासून, लक्ष्मीबाईंचे आयुष्य नारायणराव टिळकांच्या सहवासात, त्यांच्या बरोबरीने चालले होते. टिळकांच्या धर्मांतरानंतरची पाच वर्षे त्यांना पतीपासून दूर राहावे लागले. पण याही काळात टिळक त्यांच्या डोळ्यापुढून हलले नव्हते. पतीच्या प्रेरणेने व प्रेमानेच आपल्या आयुष्याचा प्रवास व्यवस्थित घडत असे, असे त्या प्रांजलपणे सांगतात. दोन ज्योतींचा प्रकाश एकच, दोन टिपऱ्यांचा नाद एकच, तद्वतच टिळक व लक्ष्मीबाईंचे एकमेकांशी नाते होते.

त्यांचे जीवनाचे तत्त्वज्ञान फार आशावादी होते. जीवनावर विश्वास होता. म्हणूनच संकट प्रसंगातून त्यांची आपोआप सुटका होत असे. त्या म्हणत, ''बोलतांना नेहमी साधेसुधे बोलावे. व्हायचे ते होतेच. पोर व ढोर सारखेच. ढोराला चारा असला की चाललेच ते पुढे पुढे, पोराला गंमत दिसली की, चाललेच ते तिच्यामागे.'' 'स्वच्छता, टापटीप, ही जातीपेक्षा व्यक्तींवर अवलंबून आहे.' 'जगात वाईट नसते तर चांगले कळले नसते.' लक्ष्मीबाईंचे हे विचार लक्षात ठेवण्यासारखे आहेत.

टिळकांची हौस होती की, आपली पत्नी मोठी व्हावी, लेखिका, कवयित्री, वक्ता व्हावी आणि त्याप्रमाणे त्यांनी लक्ष्मीबाईंना प्रेमळ प्रोत्साहन दिले. इतकेच काय, पण पहिले भाषणही त्यांनी लिहून दिले व पाठही करून घेतले. लक्ष्मीबाईंनी ते भाषण, नगर येथील ऐक्य सभेपुढे डॉ. ह्यूम साहेबांच्या उपस्थितीत केले. म्हणून त्यांना सभाधीटपणा आला. टिळकांच्या सहवासात त्यासुद्धा दीन-दुबळ्यांसाठी खपू लागल्या. आंधळ्यांना, लंगड्यांना, अनाथांना त्यांनी आधार दिला. 'हौशी' व 'दया' ह्या मानसकन्यांची त्यांनी केलेली जपणूक व त्यांनी दिलेले प्रेम लक्ष्मीबाईंच्या मायाळू स्वभावाची साक्ष पटवितात. देवावरचा विश्वास हीच त्यांच्या घरची मोठी शिल्लक होती. म्हणून मिशनच्या बोर्डिंगमधल्या मुलांना खूप माया व प्रेम देऊन किंबहुना त्यांची आई होऊनच त्या सेवा करत राहिल्या. बालकवींसारखा कवी घडविण्यात टिळकांपेक्षा लक्ष्मीबाईंचा वाटा अधिक आहे. त्यांच्या घरी चोरून लपून काही होत नसे. सारे काही उघड असे. बोलत बसले तरी दारे खिडक्या बंद नसत. पडद्याच्या अंतःकरणातच ठाव नव्हता तर प्रत्यक्ष पडदा घरात कसा असेल? म्हणूनच पडदा पद्धतीचे त्यांना वावडे होते.

सरळपणा व मोकळेपणा हे त्यांचे विशेष गुण होते. पहिल्यापासून त्यांनी गरिबीत दिवस काढले. पण गरिबीची कधी लाज बाळगली नाही. स्वाभिमानाने, कष्टाने जीवन जगल्या. उत्तर आयुष्यात कुणाचेही कर्ज त्यांच्याकडे नव्हते, भिन्न जातींचे, भिन्न धर्मांचे, भिन्न विचारांचे पण एकदिलाचे संमेलन त्यांच्या घरी असे.

नारायणराव टिळकांची कमालीची अध्यात्मिक उन्नती शेवटच्या काळात झाली. तशीच लक्ष्मीबाईंची बौद्धिक उन्नती शेवटच्या काळात झाली. ज्यांना धड लिहिता येत नव्हते, त्यांनी 'स्मृतिचित्रां'सारखे गद्य लिखाण व 'ख्रिस्तायन'सारखे महाकाव्य लिहावे, हा एक चमत्कारच नव्हे काय? नाशिकच्या १९३३ च्या कविसंमेलनात व काही ख्रिस्ती सभांमधून लक्ष्मीबाईंनी आपले वक्तृत्व कौशल्य दाखविले.

न बोलणाऱ्या, न लिहिणाऱ्या समाजाने त्यांना समाजसेवविका म्हणून गौरविले होते. मुलगी, आई बहीण आजी ह्या नात्यांनी त्यांनी आयुष्यभर त्यांचा करता येई तेवढी सेवा केली होती.

त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे त्या सर्वांना हव्याशा वाटत. त्यांना कोठेही जावयास मज्जाव नसे. अस्पृश्य, दीन-दलित सर्वांना त्यांनी जणू आपले नातेवाईक मानले होते. म्हणूनच गरीब-श्रीमंत, लहान-तरुण, वृद्ध अशा सर्व मंडळींना त्या प्रिय होत्या. जेथे लक्ष्मीबाई जाते तेथे त्यांचे स्वागतच होई. त्या नेहमी म्हणत, 'दुसरे कसेही वागले तरी आपण त्यांच्याशी चांगले वागावे.'

जिथे वेचले माणिक मोती, तिथेच सरली अवघी नाती। फिरेल जग हे शोधित माझ्या रखेमधले सुर ।।

प्रायोजक- स्वास्तिक बिल्डर्स (अनिल लोढा, राजेंद्र गोठी), मखमलाबाद नाक्याजवळ, नाशिक ▯ ५१३५६०

दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची त्यांची सहजप्रवृत्ती होती. कोणाला औषध आणून दे, तर कोणाच्या घरी सोबत निजावयास जा, कोणाला नोकर पाहून दे, असे अनेक व्याप त्यांच्यामागे असत.ऊन-पाऊस, तहान-भूक सर्व बाजूला ठेवून दुसऱ्यांची कामे त्या फार आस्थेने करीत.

नाशिकच्या स्त्रीमंडळाच्या सभेला एकदा त्यांनी काव्यगायन केले. तेव्हा त्यांनी अट घातली की, प्रत्येकीने तिचे घरचे जुने व टाकाऊ कपडे त्यांच्याकडे पोहोचते करावयाचे. ते कपडे घेऊन लक्ष्मीबाईंनी गोरगरिबांना त्यांचे वाटप केले. पतित स्त्रियांच्या बाबतीत लक्ष्मीबाईंना फार काळजी वाटे. १९०८ सालापासून त्यांनी भाषणे करून व लेख लिहून लोकमत बनविण्याचा प्रयत्न केला. एक पत्नी जिवंत असतांना दुसरी करू नये, असे त्यांचे मत होते.

लक्ष्मीबाईंचे प्राणिमात्रावरील प्रेम वाखाणण्यासारखे होते. 'कल्याणी' व 'सोनी' ह्या म्हशी, तसेच कोंबड्या, पोपट, ब्लॅकी कुत्रा, बन्या बोका आणि चंपी नावाची कुत्री. या सर्वांवर त्यांचा विलक्षण जीव होता. त्यासंबंधीचे प्रसंग त्यांनी 'स्मृतिचित्रां'त फारच बहारदार पद्धतीने कथन केले आहेत.

टिळक स्वभवाने शांत, पण अतिशय रागीटही होते. प्रसंगी टिळक रावागले तर लक्ष्मीबाई हसत हसत तो प्रसंग निभावून न्यायच्या. कारण टिळकांचे मोठेपण त्यांना समजलेले होते व टिळकांचेही लक्ष्मीबाईंवर मनापासून प्रेम होते. त्यांनी, त्यांना सन्मानानेच वागविले. टिळक खूप खर्चिक तर लक्ष्मीबाई व्यवहाराला सांभाळून राहणाऱ्या. असे अनेक विरोध असूनही एकमेकांना समजून घेत त्यांचा संसार दारिद्र्यातही समाधानाने चालला होता.

एकूण प्रांजळ आत्मकथन, रे. टिळकांच्या सहवासात लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीचा आलेख, त्या अनुषंगाने येणारे सामाजिक स्थितीचे वर्णन, एका मनस्वी प्रतिभाशाली कवीची पत्नी म्हणून सामोऱ्या आलेल्या परिस्थितीला अतिशय मोकळ्या मनानं सामोरे जाणे, या आत्मचारित्रात दिसते. त्यामुळे एका 'स्त्री'चे नव्हे तर स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे आत्मचरित्र म्हणून 'स्मृतिचित्रे' ही मराठी वाङ्मयातील अलौकिक अशी कलाकृती होय. ती मुळातूनच वाचायला हवी.

**पुस्तक** – 'संपूर्ण स्मृतिचित्रे'
**प्रकाशन**–पॉप्युलर
**किंमत**– चारशे रुपये ▯

---

**प्रा. मीरा पटारे**
'शालिवाहन' बंगला, सिद्धार्थनगर
अहमदनगर

---

# माझी चांदबिबी

**संजीवनी बोकील**

परवाच्या दिवशी तळमळीने बोलणाऱ्या एका महिला वक्त्यानं पुढ्यातल्या महिला श्रोत्यांना प्रश्न विचारला, 'रातोरात खिंडार बुजवून, त्या खिंडाराच्या समोर पहारा देणाऱ्या 'चांदबिबी' सारख्या स्त्रिया आता कुठे गेल्या?' अत्याचाराला बळी पडणाऱ्या असहाय स्त्रियांच्या जागृतीसाठी कळकळीनं विचारलेला तो प्रश्न माझ्या मनात, कपड्यात शिरलेल्या एखाद्या धसकटासारखा शिरून बसला आणि रस्त्यानं जाताना भेटली पारुबाई नि त्या प्रश्नाचं उत्तर मी लगेच देऊन टाकलं, होय, आजही चांदबिबी आहे. माझ्यासमोरच ती उभी आहे.

परिस्थितीने तिच्या आयुष्याला वेळोवेळी दुर्दैवाची खिंडार पाडली, पण प्रत्येक वेळी कठोर जिगीषेची चिलखतं घालून ती हिंमतीनं उभी राहिली. परिश्रम आणि धैर्याच्या दगड-चुन्यानं नित्य नवी खिंडारं बुजवित राहिली. असामान्य चिकाटी, जिद्द यांच्या सैन्याच्या जोरावर लढत राहिली आणि म्हणून आज तिच्या किल्ल्यावर तिचंच निशाण फडकतं आहे. आज आपल्या किल्ल्यात अभिमानानं हिंडताना तिच्या सगळ्या जखमा बुजून गेल्या आहेत.

पारुबाई माझी कामवाली. धुणं-भांड्याची कामं करणारी. मनाचा प्रामाणिकपणा दाखवणारा स्वच्छ हसतमुख चेहरा, बऱ्यापैकी उंची नीटनेटकं नऊवारी लुगडं, कपाळावर

नवीन क्षितिजे, नव्या युगाची। नवीन स्वप्ने कर्तृत्वाची, त्यागाची अन् उपासनेची ।।

ठसठशीत कुंकू आणि हातात कायम खळखळणाऱ्या काचेच्या बांगड्या.

पारुबाईचं माहेर मावळ तालुक्यातलं मळवंडी. भातशेतीचा उद्योग. लग्न होऊन ती आली मुळशी तालुक्यातल्या काशिक गावात. तीन वर्ष तिथं काढली. तिथंही भातशेतीचा पिढीजात उद्योग. पण नवऱ्यानं पुण्याची वाट धरली नि तो सिलेंडरच्या दुकानात कामाला लागला. तशी पारुबाईही त्याच्या पाठोपाठ शहरात आली. एका रिफाडच्या, वर चटई टाकलेल्या अशा घरात, पौड रस्त्यावरच्या केळेवाडीत पारुबाईचा संसार वाढू लागलए. नवऱ्यानं ते काम सोडून हातगाडी ओढायला सुरुवात केली नि पारुबाईनंही जवळच्या उच्चभ्रू लोकांच्या घरांमधून धुण्याभांड्याची काम करायला सुरुवात केली. त्या वेळी घरटी फक्त दहा-पंधरा रुपये मिळायचे. दहा-पंधरा कामं पारुबाई उरकू लागली. दीडशे-दोनशे रुपयांची भर नवऱ्याच्या मिळकतीत पडू लागली. नवनाथ-चित्रा-कविता नि कालिदास असा प्रपंच विस्तारला. त्याला पुरं पडण्यासाठी ही आई ढोरमेहनत करू लागली. मात्र अशातच नवऱ्याचा दारूचा नाद वाढत गेला. कविताच्या जन्मानंतर त्यानं बैलगाडी घेतली होती. एका कडाप्पा बनवणाऱ्या कारखान्यात कामाला लागला तो. रोजगार आणि शिवाय बक्षिसी मिळून शंभर एक रुपये दिवसाकाठी त्याला सहज मिळत. पण दिवस मावळला नि खिसा भरला की मग मोर्चा वळे तो दारूच्या गुत्याकडे. पार बेहोश झाला की लोकं त्याला उचलून गाडीत टाकीत. कित्येकदा बैल न सांगता घरापर्यंत घेऊन येई. कधी-कधी तर तो रिकामी गाडीसुद्धा ओढीत आणी. खिशात पैसे होते किती नि आहेत किती? याचं भान कुठून राहणार? मग स्वारी दिवे लागणीला धुंद होऊन घरी पोहोचायची.

सकाळपासून काबाडकष्ट करून पारुबाई घरी आलेली असायची.चुलीवर काही-बाही रटरटत असायचं. मुलं कोपऱ्यात आपला अभ्यास करत बसलेली असायची आणि मग अनेक कमनशिबी घरांत घडणारं नाटक, इथेही सुरू व्हायचं. शिव्यागाळ, आरडाओरड, मारहाण! हे सारं कसंतरी सहन करायची पारु. पण जेव्हा नवरा मुलांच्या हातातली वह्या पुस्तकं ओढून फेकू लागायचा, तेव्हा तिची तडफड अनावर व्हायची. कारण पोरांनी खूप शिकांव एवढाच ध्यास तिच्या जिवानं घेतला होता. ही परिस्थिती बदलायची असेल तर पोरांना आपल्याच्यानं होईल तेवढं शिकवायला पाहिजे, ही खूणगाठ तिनं आपल्या पदराला घट्ट मारून ठेवली.

मग थोरल्या नवनाथला लवकरच जेवायला घालून ती त्याला मोरे विद्यालयामध्ये पाठवू लागली. तिथे बाहेरच्या बाजूला जिथे-जिथे ट्यूबलाइटस् लावलेल्या असायच्या; त्या उजेडात बसून नवनाथ एक-दीड वाजेपर्यंत अभ्यास करू लागला. त्याची धाकटी बहीण चित्रा मात्र रात्री-बेरात्री अशी बाहेर कशी जाणार? बिचारी रडायची, पण त्या त्रासातच अभ्यास करू लागला. त्याची धाकटी बहीण चित्रा मात्र रात्री-बेरात्री अशी बाहेर कशी जाणार? बिचारी रडायची, पण त्या त्रासातच अभ्यास करायची. तरीही एकदाही कधी नापास झाली नाही. तिच्या शाळेची सुट्टी झाली की, पारुबाई तिला शिवणाच्या क्लासमध्ये गुंतवायची, जेणेकरून तिनं वेड्यावाकड्या संगतीला लागू नये.

ती काम करायची त्या गोरे काकूंकडे तिनं नवनाथला शिकवणी लावली. त्यालासुद्धा ती जराही रिकामा सोडत नसे. कारण आजूबाजूच्या वातावरणात त्याला बिघडायला थोडा देखील वेळ लागला नसता. म्हणून तिनं डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवलं. ती कामं करायची त्या-त्या ठिकाणी आपल्या वागण्या बोलण्यनं तिनं स्वतःबद्दल एक चांगलं मत तयार केलं होतंच. त्या सगळ्यांनी तिचा मुलांच्या शिक्षणाचा ध्यास लक्षात घेतला आणि सहकार्याचे हात पुढे केले. गोरे काकूंनी नवनाथकडे जास्त लक्ष देऊन शिकवलं. शोभाताईनी त्याच्याकडून १० वीच्या प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या, तपासून दिल्या. नवनाथचे दहावीचे मार्कसुद्धा इतक्या वर्षांनी पारुने पटकन् सांगितले, ७०० पैकी ५०५. तिचा त्याच्या भवितव्यविषयीचा ध्यास मला पुन्हा एकदा कळून आला.

नवनाथला पारुनं कॉलेजात घातलं. जोशीकाकांनी त्याला अभ्यासासाठी त्यांच्या एका खोलीत

माणूस म्हणून जगायचे तर, लाचारीचे नको जिणे, अभिमानाने सन्मानाने, या जगतात रहाणे.

With Best compliments from - **ADEPT FLUIDYNE (P.) LTD.,** Kothrud Industrial Estate, Pune 29.

येऊन बसायला सांगितलं. तिथं हा अशा वेळी जायचा की जेव्हा लाईट लावायला लागायचा नाही. कितीही गरम होत असलं तरी त्यानं कधी पंख्याच्या बटणाला हात लावला नाही.

आता पारुबाई वाघासारखी कामाला लागली. सकाळी सातला ती घराबाहेर पडे ती चौदा घरची कामं करून संध्याकाळी पाच-साडेपाचला घरी जाई. अशातच तिनं दोन दिरांना पाच वर्ष सांभाळलं. चित्राला हाताशी घेऊन महिना हजार-बाराशे मिळू लागले. नवनाथ दहावी पास झाल्याबरोबर वंदनाताई भट यांनी त्याला पौड फाट्यावरच्या धांडे लॅबमध्ये कामाला लावलं. बाटल्या धुणं, रिपार्ट पोहोचवणं अशी काम करीत नवनाथ बारावी झाला. तेव्हा त्या लॅबमध्ये क्रिश्ना नावाचा तंत्रज्ञ होता. नवनाथला त्यानं जवळून पाहिल्यामुळे त्याच्या मनात नवनाथविषयी आपुलकी निर्माण झाली होती. नवनाथला तो म्हणाला, ''हे काम किती दिवस करणार? तू पण माझ्यासारखा डिप्लोमा कर. हुशार आहेस, कष्टाळू आहेस.'' पण नुसत्या कष्टाने काय होणार? पैशाची व्यवस्था? 'ते मी बघते' पारु नावाची हिरकणी पुढे झाली. जोशी, फडके, गोरे अशा कामावरून तिनं पैसे कर्जाऊ घेतले. नवनाथच्या पगाराला हातही न लावता तिनं ५,००० रु. जमवले होते.

क्रिश्ना आणि नवनाथ दोघांनाही एकदम रजा मिळणार नाही, असं वाटल्यामुळे दोघांनीही डॉ.धांडे यांना परगावी जातो, कुठे जातो हे



सांगितलंच नव्हतं. मुलांनी काहीतरी थाप मारली हे पारुला कळलं. ती स्वतः लॅबमध्ये गेली. तिनं सरांना सर्व काही खरंखरं सांगितलं इतकी वर्षे डॉ. धांडे यांनी नवनाथला दिलेली मायेची साथ ती विसरली नव्हती.

क्रिश्ना नवनाथबरोबर स्वतः गेला. त्याची सगळी व्यवस्था लावून परत आला. तामिळनाडूतल्या तिरुपुत्तुर या शहरात १ वर्ष राहून नवनाथने 'डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी' हा कोर्स वसतिगृहामध्ये राहून केला आणि द्वितीय श्रेणीत तो उत्तीर्णही झाला. ३००रु. पगारावर काम करणारा 'नवनाथ' नावाचा पोऱ्या आता तंत्रज्ञ म्हणून ४,०००/- रु. पगार मिळवू लागला. मोठ्या हुद्याच्या जागेवर नोकरी करू लागला.

नवनाथ शिकण्यासाठी परगावी असतानाच पारूबाईच्या राहत्या जागेत कटकटी निर्माण होऊ लागल्या. भांडणं-शिवीगाळी यात काबाडकष्ट करून थकलेल्या पारुबाईचं रक्त आटू लागलं. नवरा रागावून आकुर्डीला वॉचमन म्हणून रहायला गेला होता. स्वतःच्या हिमतीवर पारुबाईनं घराला गिऱ्हाईक बघितलं. १०,००० रु. विसार दिला. जुनं घर विकल्यावर अन् पूर्ण पैसे दिल्यावरच ती नव्या घरात रहायला गेली. या घरासाठी धांडे सरांनी सुद्धा ५,००० रु. पटकन काढून दिले.

पारूबाई आता हक्काच्या पक्क्या घरात राहते. तिनं चित्रालाही नववी पर्यंत शिकवलं. नवऱ्याचा पाठिंबा असता तर अजूनही शिकवलं असतं, असं ती म्हणते. पण या शिक्षणाबरोबर एक महत्त्वाचं काम तिनं केलं, ते म्हणजे चित्राचं चांगला निर्व्यसनी मुलगा बघून थाटामाटात लग्न लावून दिलं. जावई कर्तबगार आहे. चित्रा स्वतः शिवणकाम करून संसाराला हातभार लावते. लग्नाच्या आधी एकदा चित्राला केळेवाडीतल्या काही गुडांनी त्रास द्यायला सुरुवात केली होती. तेव्हा पारूबाईनं स्वतः पोलिसचौकीत जाऊन तक्रार नोंदवली होती. सुशिक्षित स्त्रीजवळ नसलेली वाघनखं पारुनं जगताना अनेकदा खंबीरपणे वापरली.

पारुची कथा इथवरच येऊन थांबत नाही. नवऱ्याची थोडीही मदत नसताना हिनं झगडून सासरच्या शेतीतला आपला वाटा मिळवला. मुळशी तालुक्यातल्या काशिक गावी आपला संसार, कामं संभाळून ती येऊन -जाऊन करू लागली. दीर-जावेने तिला पळवून लावण्याचे खूप प्रयत्न केले. पण ही वाघीण बधली नाही. आतेबहिणीचे बैल-औत


येता पाखरू अंगणी, त्याला जिव्हाळ्याचा घास, त्याच्या पायात मावेना, दूरदूरचा प्रवास।

**मोकाशी कुटुंबियांकडून प्रबोधकांना शुभेच्छा!**

घेऊन हिनं आपल्या वाट्याची शेती कसली. पहिल्या वर्षी सोळा पोती भात, दोन पोती गहू, चाळीस पोती बटाटा काढला. एवढ्यावरच ती थांबली नाही. कविताच्या नावावर थोडे थोडे पैसे टाकून तिने आठ हजार रुपये जमवले होते. ते पैसे कर्जाऊ देऊन त्यातून तिनं एक शेत गहाण ठेवून घेतलं आणि स्वतः सगळे व्यवहार केले. आठ हजार रुपये लावून या बहाद्दरीनं तीस हजार रूपये कमवून दाखवले.

हळूहळू गावातले लोक पारुचे कष्ट नावाजू लागले. तसे तिच्या नवऱ्याचेही डोळे उघडले. त्याला पारुनं गावी नेलं. त्याला आता शेतीची गोडी लागली आहे. मग हळूहळू पिणंही कमी होत आलं. पारु हसत म्हणते, ‘‘तरी एखादं पोतं चुपचाप विकतो आणि जरा डांगडिंग करतो. जाताना नवऱ्याच्या विडीकाडीपासून सगळं इथून घेऊन जाते. त्याच्या हातात मात्र पैसा देत नाही.

कालिदासाला भावानं रिक्षा घेऊन दिली आहे. धाकटी कविता रिकामी राहू नये म्हणून एक दिवसभराच्या कामावर पारुनं तिला अडकवून टाकलं आहे. नवनाथचं आणि कविताचं दोघांचंही शुभमंगल आता एकदमचं होईल. चित्रा आपल्या संसारात सुखी आहे.

पारुबाईनं आता कामं सोडली आहेत. मला भेटायला ती येते तेव्हा हमखास बिस्किटाचा पुडा घेऊन येते. माझा सलिल आता २० वर्षाचा झाला आहे, हे तिच्या लक्षातच येत नाही. बैलपोळ्याच्या दिवशी हट्टानं तिच्याकडे जाणारा, गुळवणी आणि पुरणपोळी खाणारा सल्लूच तिच्या नजरेसमोर असतो. समाधानानं खुर्चीत बसते. तिच्या पोराच्या डोळ्यासमोर तिनं उपसलेला कष्टाचा काळ अजून जसाच्या तसा उभा आहे,याचं तिला आंतरिक समाधान आहे. डोक्यावरून पदर घेत ‘‘नवऱ्याविषयी लई वाईट लिहू नका हां. तसा चांगला आहे तो.’’ तेव्हा मात्र माझ्या कल्पनेतल्या या चांदबिबीची चिलखतं गळून पडतात आणि आतली हाडामासाची स्त्री मला दिसू लागते. खरं सांगू, पण तीचं हे रूपदेखील तितकंच लोभस वाटतं.

**(पारुबाई टेमघरे**
किष्किंधा नगरजवळ, कोथरूड,
समर्थ कॉलनी, पुणे २९)

**प्रा. संजीवनी बोकील**
विजयालक्ष्मी अपार्टमेंट, रामबाग
कॉलनी पौड रोड, पुणे ३८

## ५२ व्या शतकात प्रवेश!

'काळ' ही एक अशी संकल्पना आहे, की त्या काळाच्या मोजणीसाठी अनेक परिमाणे अस्तित्वात आहेत. जग २१व्या शतकात प्रवेश करणार, असं म्हटलं जात असताना, आपण मात्र चैत्र शु. प्रतिपदेला ५२ व्या शतकात प्रवेश करीत आहोत!

हे कसे काय? तर, भारतीय कालगणना ही जगातील सर्वात प्राचीन कालगणना आहे. ही कालगणना चार युगांच्या संकल्पनेत मांडली आहे. कालानुसार बदलण्याच्या मानमार्दीच्या अवस्था, विशिष्ट कालखंड, कालपरिमाण इ. दर्शविण्यासाठी जगातील विविध संस्कृतींमध्ये वापरली जाणारी, भारतीय कालगणनेच्या क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण संकल्पना म्हणजे 'युग'. आपल्याकडे कृत, त्रेता, द्वापार आणि कली अशी चार युगे मानली आहेत. या चार युगांच्या चक्राकार कालगतीची संकल्पना मांडली आहे. त्यामुळे हे युगचक्र अखंडपणे चालूच राहील! ही चार युगे मिळून एक महायुग बनते.

३६५ दिवसांचे एक मानवी वर्ष. अशी ३६० मानवी वर्षे मिळून 'एक दिव्य वर्ष' बनते आणि एका महायुगात १२,००० दिव्य वर्षे असतात. म्हणजे एका महायुगात ४३ लाख २० हजार मानवी वर्षे असतात! त्यांची चार युगांमध्ये विभागणी सांगायची तर कलियुगाच्या दुप्पट वर्षे द्वापारयुगात असतात. कलियुगाच्या तिप्पट त्रेतायुगात; तर चौपट कृतयुगाची वर्षे असतात.

आपण असे गणितच मांडू :-

| | |
|---|---|
| कलियुग | ४,३२,००० वर्षे |
| द्वापारयुग | ८,६४,००० वर्षे |
| त्रेतायुग | १२,९६,००० वर्षे |
| कृतयुग | १७, २८,००० वर्षे |
| एका महायुगाचा कालावधी | ४३, २०, ००० वर्षे |

आता आज आपण कुठे आहोत? ते पाहू. या महायुगांच्या चक्रातील २८ वे महायुग सध्या चालू असून, त्याची कृत, त्रेता व द्वापार, ही तीन युगे उलटून गेली आहेत. कुरुक्षेत्रावरील कौरव व पांडव यांच्यातील भारतीय युद्धानंतर, द्वापार युगाची समाप्ती झाली आणि कलियुगाला प्रारंभ झाला. त्यावेळी युधिष्ठिर सम्राट झाल्यामुळे या कलियुगाला 'युधिष्ठिर शक' असेही म्हटले जाते. चालू कलियुगाच्या एकूण ४,३२,००० वर्षांपैकी ५१०० वर्षे आता पूर्ण होत असून लवकरच ५१०१ शक सुरू होणार आहे. म्हणूनच आपण ५२ व्या शतकात प्रवेश करणार आहोत, असे म्हणूया! आणि या नव्या शतकाच्या स्वागताला सिद्धही होऊया!

*युधिष्ठिराची शतके गेली। पंचसहस्र अन् वरती एक।।*
*नव वर्षाची नान्दी झाली। नव शतकाची प्रभात आली।।*
*गुढी उभवूया प्रतीपदेची। प्रमाथीनाम संवत्सराची।।*

कु. दीपाली जोशी

एका उजळत्या सकाळी फूल पाखराला म्हणाले, आता मला तुझे फुलपंखी पंख दे, आकाशाचा मोकळेपणा डोळे भरून पाहू दे.

छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा! प्रायोजक - महाराष्ट्र ॲग्रिकल्चर बायोटेक, पुणे ३०.

## कविता पानोपानी




*स्वच्छंदपणे विहरावे, ही मनात माझ्या आस*
*मी आकाशीचा पक्षी हे सत्य, नसे हा भास.*

*हे क्षितिज रंगीत माझे, मी सहज तिथे झेपावे*
*त्या रंगांमध्ये माझे आयुष्य रंगुनी जावे*

*हा भरार वाहे वारा, हे वणवे पेटुन उठती*
*सर्वांना पार करोनि, मी जाईन पुढती पुढती*

*चैतन्य मंत्र देणाऱ्या सूर्याची करितो भक्ती*
*काळोख दूर करण्याची तो नित्य देतसे शक्ती*

**श्रीमती आश्लेषा महाजन,**
२३० चित्ररेखा सोसा, सहकारनगर १, पुणे ९

# आई

*अलीकडे परमेश्वर तुझ्यामध्ये तर*
*येऊन वसलेला नाही ना आई? ।। धृ ।।*

*कारण जेव्हा जेव्हा माझा*
*व्याकूळ आत्मा 'त्याला' हाकारतो*
*मदतीसाठी धावा करतो.*
*तेव्हा तेव्हा ओठावर येते*
*ते तुझेच नाव असते आई ।।१।।*

*इतकी ओढ वाटते अंतरातून ज्याची*
*तो सर्वसाक्षी ईश्वर असतो तरी कुठे?*
*कारण शांतावलेल्या अवस्थेत देखील*
*माझ्या श्वासाश्वासाला हल्ली*
*तुझाच गंध असतो बघ आई ।।२।।*

*कधीकधी मी त्याला समजते*
*आकार माझ्या मनाचा*
*तो आकार देखील तुझाच असतो*
*देहाच्या कणाकणातून त्याचे ऋण आठवतांना*
*हुंदका तुझ्या आठवणीने येतो आई ।।३।।*

*अशी जागा आहेस तू जगातली*
*जिथे माझ्या हाती फक्त फुलेच आली*
*असे आकाश तू माझ्या जीवनातले*
*जिथला निळा रंग कधी, कधीच*
*विटलाच नाही बघ आई ।।४।।*

*एक मंदिर आहेस तू माझ्यासाठी*
*जिथे मी फक्त पूजा केली*
*तिथल्या याचनेला कधी इच्छेचा वास नव्हता*
*तिथल्या गाभाऱ्याला धुपाचा गंध*
*मनोमनी अजून दरवळतो आई ।।५।।*

*अलीकडे परमेश्वर तुझ्यामध्ये तर*
*येऊन वसलेला नाही ना आई ।।*

***श्रीमती स्वाती सामक,***
*६३७ बुधवार पेठ, पुणे २*

| |
|---|
| मी जाईन तेथे मजला, शब्दांचे 'मी' पण ड़सले। जन्माच्या सायंकाळी, कवितेचे अंगण दिसले। |

**छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा! प्रायोजक - कौशिक एंटरप्रायजेस, पुणे ३८.**

# कॉपी करणार नाही

**परीक्षेत कॉपी करणे म्हणजे शिक्षण क्षेत्रातील भष्ट्राचार आहे, असे तुम्ही मानता ना! मग तो तुम्ही थांबवायला हवा. मग आजच असा ठाम निश्चय करा – मी कोणत्याही परीक्षेत स्वतः कॉपी करणार नाही व माझ्या वर्गातील इतर कोणासही कॉपी करू देणार नाही. या साध्या निश्चयातून तुम्हाला मिळेल भविष्यात भ्रष्ट्राचार व दुष्टप्रवृत्तींविरुद्ध लढण्याचे बळ आणि आत्मविश्वास. पुढे काही थोर व्यक्तींनी या संदर्भात तुम्हाला खास संदेश दिला आहे. तुमच्या निश्चयाला यातून नक्कीच पाठबळ मिळेल.**



कोणत्याही पद्धतीने कॉपी केली तरी कॉपी ती कॉपीच! उत्तरपत्रिका लिहताना अशा अवैध मार्गांचा अवलंब करणे हा मोठा गुन्हा आहे. ते पाप आहे. अशा वेळी आपण आपल्या गुरुजनांचा, आपला स्वतःचा आणि आपल्या विद्येचा अपमान करत असतो. मुलांनो, कॉपी करण्याच्या क्षुद्र मोहाला तुम्ही कधीही बळी पडता कामा नये. त्यापेक्षा परीक्षेत अपयश आले तरी बेहत्तर!

**शान्ता ज. शेळके**
(ज्येष्ठ कवयित्री)



तुम्ही दुसऱ्याचे कपडे घालता का? दुसऱ्याचे उष्टे खाता-पिता का? 'कॉपी' करणे ही त्याहून वाईट सवय आहे.त्यातून असे सिद्ध होते, की तुम्ही स्वतंत्र विचार करू शकत नाही. प्रश्नांची उत्तरे देण्यात स्वावलंबी व्हायला शिका.

**जयंत नारळीकर**
(ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ)



*कॉपी करणे हा गुन्हा आहे, भ्रष्टाचार आहे. त्यात तुम्ही इतरांना फसवत नाही, स्वतःलाच फसवता. कारण तो अभ्यास नसतो. अभ्यासाचा आभास असतो. ही एक प्रकारची चोरी आहे. आयुष्यात चोरीच्या नव्हे, तर सन्मार्गाने मोठे व्हा.*

***विजय कुवळेकर***
*(मुख्य संपादक 'सकाळ' वृत्तसमूह)*

*माणसानं स्वतःचंच जगावं. त्यामध्ये स्वतःबद्दलचा विश्वास वाढतो आणि दुसऱ्याचाही आपल्याबद्दलचा विश्वास वाढत जातो. ही गोष्ट जशी धनाने वाढते; तशी ती ज्ञानानेही वाढते, किंबहुना ज्ञानाने अधिक वाढते. म्हणून ज्ञान हे नेहमी आपलं असावं, उसनं धन किंवा ज्ञान किती दिवस पुरणार कदाचित आत्ताची तात्कालिक गरज ते भागवेल, पण जन्मभर तुम्ही दरिद्री व दीनवाणे राहाल. म्हणून ज्याची आपण नक्कल करतो त्याचा वरचष्मा असतो. त्याच्या कोणत्याही प्रसंगी आपण स्वतःच्या पायावर, स्वबळावर उभे राहतो. कॉपी करणं म्हणजे आपण स्वतः न जगणं. ज्याची आपण कॉपी करतो किती शहाणा हाही प्रश्नच आहे. चुकीच्या गोष्टीची नक्कल होऊ शकते, म्हणून स्वतःची बुद्धी ही खरी शक्ती. शिवाय ताब्यात आपण राहतो व त्याचा गुलाम होतो; स्वातंत्र्य गमावतो, कॉपी करणं हा नैतिक गुन्हा आहे. म्हणून स्वतःशी प्रामाणिक राहणं हा खरा सत्‌धर्म होय.*

**डॉ.व.दि. कुलकर्णी**
(व्यासंगी लेखक, प्राध्यापक)

वर्तमान योजि जो निज सत् कार्यास पंखावरी नेईल कीर्ति तया स्वर्गास.

मे. बाबर सिमेंट अँड इंडस्ट्रिअल गॅस एजन्सी, फ्लॉट नं.१, संध्या सोसा., शिंदे हास्कूलसमोर, सहकारनगर, पुणे ९. ५२३४९९

# आम्ही कॉपी करू देणार नाही !!



परीक्षेत 'कॉपी' करण्याची इच्छा निर्माण होणं ही आपल्या ठायी असलेले आत्मविश्वास हरविल्याचं लक्षण होय. स्वतःचा प्रयत्नवाद आपण गमावून बसतो. कॉपीची ही सवय मग केवळ परीक्षेच्या क्षेत्रापुरती मर्यादित राहत नाही. तर पुढे अनेक क्षेत्रांत परावलंबनाची, परानुकरणाची, उसनवारीची ही भावना प्रबल होऊ लागते आणि शेवटी ती आत्मघातालाही कारणीभूत होते.

'कॉपी'म्हणजे बौद्धिक चोरीच असते. तेव्हा कॉपी करण्यामुळे आत्मविश्वास गमविणं, स्वकर्तृत्वाला व प्रयत्नवादाला विसरणं, फसवणूक करण्याची प्रवृत्ती जोपासणं आणि 'बौद्धिक चोरी' करण्याचा दुर्गुण अंगी निर्माण करणं होय. परीक्षेत 'गुण'वंत बनण्यासाठी दुर्गुणी बनण्याचा हा मोह कटाक्षाने टाळा, आणि स्वप्रयत्नाने खरेखुरे गुणवंत होण्याचा आनंद मिळवा.

**प्र.ल.गावडे**
(शिक्षणतज्ज्ञ)



कॉपी करून तुम्ही कदाचित उत्तीर्ण व्हालही. पण जे तुम्ही नाहीत ते आहात या भ्रमातून काय मिळविणार? ''परीक्षेतलं यश!'' असं तुम्ही म्हणाल. पण काय किंमतीच हे यश?

नवीन जगच मुळी कॉपी करण्यासाठी नाही तुम्ही कमी गुणाचे असलात तरी चालेल. पण जसे आहात तसेच दिसूद्यात. त्यातूनच फक्त आयुष्यभर पुरणाऱ्या निर्भीडतेची व शौर्याची शिदोरी तुमच्या पाठी येईल. हे धैर्यशाली, शूर व्यक्तिमत्त्व, कॉपी करणाऱ्या चोरट्या माणसापेक्षा उपयोगाचं व आत्मविश्वास देणारं आहे. कॉपी करण्यापेक्षा न करण्याला जास्त शौर्य लागतं. म्हणून तुम्ही ती करू नकाच पण इतरांनाही आजिबात करू देऊ नका.

**डॉ. वसंत गोवारीकर**
(सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ)



मुलांनी विषयाचा अभ्यास केला नाही म्हणजे त्यांना इतर युक्त्या प्रयुक्त्या सुचू लागतात. कॉपी हा त्यालाच प्रकर आहे. कॉपी न सापडली तर तो कदाचित पास होईल. पण त्याला विषय कळणार नाही. त्यामुळे कॉपी करणे हे सर्वस्वी मी निषिद्ध मानतो.

**जयंतराव श्री. टिळक**
(माजी सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य सरकार)



विद्यार्थी मित्रांनो ज्ञानाची उपासना ही पवित्र आणि उदात्त कृती आहे. याची सुरुवात शाळेत अभ्यास करण्यापासून होते. अभ्यासामुळे बुद्धीला धार येते. अभ्यास न करता परीक्षेत कॉपी करणे ही अपवित्र आणि विकृत कृती आहे. कॉपी करणे म्हणजे तुम्ही तुमची बुद्धी दुबळी, कमकुवत आहे अशी कबुली देणे होय. स्वाभिमान असलेला कोणीही विद्यार्थी वा विद्यार्थीनी कॉपी करणार नाही. कॉपी करून लबाडीने पास झालात तर आयुष्यभर लबाडीनेच वागाल. तसे करू नका उत्तम अभ्यास आणि परिक्षेत उत्तम यश मिळवा.

**ग.प्र.प्रधान**
(जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते)

ये जरा बाहेरी कोषातूनी, शुद्ध मोकळ्या वातावणी, का गुदमरशील आतच कुढुनि? रे! मार भरारी जरा वरी।।

With Best Compliments from - SUNIKEM ENTERPRISES

# प्रवास जिद्दीचा

**''मुलांमध्ये लहान वयापासूनच एखादं काम करण्याची जिद्द पाहिजे. या जगात अशक्य अशी कुठलीच गोष्ट नाही. हाती घेतलेली गोष्ट पूर्ण होईपर्यंत सोडायचीच नाही, अशी जिद्द मुलांमध्ये निर्माण झाली, तर त्यांच्या पुढच्या आयुष्याच्या दृष्टीनं ती यशाची पहिली पायरी ठरू शकते''**, हे उद्गार आहेत, आय.ए.एस. झालेल्या एका कर्तृत्ववान महिलेचे. तरुण पिढीचं प्रतिनिधित्व करणाऱ्या, भारतीय प्रशासकीय सेवेत असलेल्या, स्मिता गाटे यांनी या क्षेत्रातील आपले अनुभव मोकळेपणानं सागितले.

**❑ सध्या वैद्यकीय, आभियांत्रिकी या क्षेत्रांबरोबर प्रशासकीय सेवेचं क्षेत्रही तरुण पिढीला आकर्षित करत आहे. पण तुम्ही जेव्हा या क्षेत्रात प्रवेश केलात तेव्हा या क्षेत्राकडे, पुरुषांशी संबंधित क्षेत्र असंच बघितलं जायचं. मग तुम्ही या क्षेत्राकडे कशा वळलात?**

 माझे वडील हे एअर फोर्समधे होते. त्यामुळे लष्करी वातावरणात वाढलेल्या मला, लहानपणापासून आपण देशसेवेसाठी अशा प्रकारचं क्षेत्र निवडावं, असं वाटायचं; हेच स्वप्न मी लहानपणापासून जपलं आणि आय.ए.एस. अधिकारी झाल्यावर हे स्वप्न थोडंफार प्रत्यक्षातही आलं. थोडं फार अशा अर्थाने की, अजून खूप काही या क्षेत्रात मला करायचंय.दुसरं एक कारण असं की, मी आठवीत **कु. --स्मिता गाटे**



असताना, वडिलांबरोबर एक आय.ए.एस. झालेल्या अधिकारी आमच्या घरी आल्या होत्या. त्यांचं व्यक्तिमत्त्व बघून मी प्रभावित झाले. कदाचित आपणही असंच बनायचं, हे तेव्हा माझ्या मनात पक्कं रुजलं असावं. दिल्लीला आम्ही राहत असताना आमच्या कॉलनीत खूप आय.ए.एस. अधिकारी राहायचे. त्यांच्याशी बोलल्यावर, हे क्षेत्र काही फक्त पुरुषांचं क्षेत्र किंवा खूप अवघड आहे, असं नाही तर आपणही प्रयत्न करून बघायला हरकत नाही हे जाणवलं; आणि कष्ट घ्यायची आपली तयारी आणि जिद्द असेल तर आपण आपल उद्दिष्ट गाठतोच, हा माझा अनुभव आहे.

**❑ सगळे अडथळे पार करून, आय. ए.एस.झाल्यावर तुम्हाला प्रशिक्षणासाठी कुठे कुठे जावं लागलं?**

 माझं पहिलं प्रशिक्षण मसुरीला 'लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी' येथे झालं. तिथ खूपच चांगला अनुभव मला मिळाला.त्यानंतर मध्यप्रदेशातील इंदूर येथे प्रशिक्षणासाठी 'असिस्टंट कलेक्टर, या पदावर माझी नेमणूक झाली. यात एका जिल्ह्यातील तुमचं प्रशिक्षण अपेक्षित असतं. पण चांगल्या अधिकाऱ्यांमुळे, मला जास्त अनुभव मिळावा यासाठी इंदूर विभागातील इतर जिल्ह्यांमधेही मी प्रशिक्षण घेतलं.

**❑ एक स्त्री म्हणून प्रत्यक्ष काम करताना कोणत्या अडचणींना तोंड द्यावं लागलं? एखादा अनुभव -**

 या क्षेत्रात स्त्री म्हणून तुम्हाला वेगळी वागणूक मिळत नाही. तुम्ही एखाद्या महत्त्वाच्या पदावर आहात म्हटल्यावर, स्त्री असो किंवा पुरुष, तुम्हाला जबाबदारीने काम करावंच लागतं.यात बरोबरीच्या लोकांचीही खूप मदत होते. लोकांचा तुमच्यावरचा विश्वास, काम करताना तुम्हाला हुरूप आणतो. स्त्री म्हणून अडचणी अशा नाहीत, पण शुजालपूरचा एक अनुभव माझ्या चांगला लक्षात आहे. तिथे उपविभागीय अधिकारी म्हणून काम करताना, कायदा आणि सुव्यव्यस्थेच्या बाबतीत एक अनुभव आहे. त्या वेळी तिथे पाण्याची खूप कमतरता भासत होती. पिण्याच्या पाण्याचे तर हालच होते. त्यामुळे तिथे रोज काहीना काही कारणाने तणावपूर्ण वातावरण असे. पाणी पुरवठा यंत्रणा अपयशी ठरल्यानंतर, अनेकदा टँकरने पाणी पुरविलं जायचं. पण हा टँकरही येईल की नाही , याची खात्री


हवेत मजला पंख प्रतापी, विश्वाचा या ठाव घ्याया, गवसणि घालीन या गगनाला, घुमवित राहीन या धरणीला.

*With Best Compiments from* - JAISONS ENGINEERING TECHNOLOGY, Pune.

नसे.काही काही श्रीमंत लोक पाण्याच्या पाईपना मोटर लावून आपल्या घरांमध्ये पाणी भरून घेत असत. आणि मग बाकीच्या लोकांच्या घरी पाणी पोहोचेपर्यंत पाणी संपलेलंच असे.

कुणालाही न दुखवता मला हा प्रश्न सोडवायचा होता. यावर उपाय म्हणून, जेव्हा पाणी पुरवठा केला जाई, त्या वेळेला संपूर्ण गावातील वीज बंद करायची, असा मी आदेश दिला. यामुळे आपोआपच प्रत्येकाला त्याच्या वाट्याचं पाणी मिळायला लागलं. पण त्यामुळे दोन गटात तणाव निर्माण झाला. त्यातूनच जाळपोळी, तोड-फोड, मारामारी यामुळे गावातील वातावरण आणखीनच चिघळलं. टेलिफोन खात्याचाही नेमका त्याच वेळी संप होता. यातच आणखी भर म्हणजे, मध्यप्रदेश वीजमंडळाच्या अधिकाऱ्यांनी माझा आदेश न मानता, घाबरून जाऊन वीज पुरवठा सुरू केला. या सगळ्यात लोकांशी समजुतीने वागूनच मार्ग काढता आला असता, म्हणून मी गावातल्या लोकांना चर्चेला बोलावलं. पण त्या रात्रीच, पहाटे दोन वाजता, बाहेरचे २०० लोक लाठ्या वगैरे घेऊन,दोन ट्रकमधून माझ्या घरी आले. तेव्हा प्रथमच मला भीती वाटली. मात्र तेव्हा घाबरून चालणार नव्हंत. मी कॉलनीतल्या लोकांना गोळा करून त्या लोकाना घालवून दिलं. दुसऱ्या वर्षी हा प्रश्न सोडविण्यासाठी गावकऱ्यांशी चर्चा केली.मग या सगळ्याच्या विरोधात असणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले. आमचे आदेश न मानणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांवरही शिस्तभंगाची कारवाई केली. अर्थात हा प्रश्न उन्हाळ्यातच जास्त ज्वलंत असतो. पण आपण ठाम राहिल्यावर गुंडगिरी किंवा बळाच्या जोरावर तुम्हाला कुणी नमवू शकत नाही. तुम्ही घट्ट पाथ रोवून उभ राहिलं पाहिजे.

❑ **तुम्हाला कोणकोणत्या प्रकारचे अनुभव आले?**

▯ पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामासाठी मी 'सागर' मधल्या बायकांची मदत घेण्याचं ठरविलं. पण राजकीय पुढाऱ्यांपासून सगळ्यांनी त्याला विरोध केला. ही पुणे-मुंबई नाहीये. इथे बायका उंबऱ्याच्या बाहेर पाय ठेवत नाहीत, घुंघट घेऊन वावरतात, वगैरे खूप काही ऐकवून मला नाउमेद करण्याचा प्रयत्न झाला. पण मीही पक्क ठरवलं होतं की हे करून दाखवायचंच. ज्यांनी विरोध केला त्यांच्याकडून मी सहा महिने मागून घेतले. त्या बायकांशी बोलून बोलून, प्रत्यक्ष घटनास्थळी भेटी देऊन त्यांना प्रशिक्षण देऊन, पाणलोट क्षेत्र विकासाचं महत्त्व पटवून दिलं. 'सागर' हा असा जिल्हा होता, जिथं बायकांनी पुढाकार घेऊन हे काम केलं. पाणलोट क्षेत्र विकास समितीमधेही या बायकांची आम्हाला १००% मदत झाली. खूप मेहनत घेऊन आम्ही ते काम पूर्ण केलं. मी तिथली राहणारी नसूनही, त्यांच्यासाठी काम करते, मग आम्ही आमच्या गावात पाणी आणण्यासाठी काम करू शकत नाही का? अशी प्रतिक्रिया तिथल्या बायकांनी नंतर व्यक्त केली. हीच खरं तर तुमच्या कामाची पावती असते.



सागर जिल्ह्यातच, पाणलोट क्षेत्राच्या कामातील काही महिलांना आम्ही स्वयंसेवक बनवून स्वच्छता, आरोग्य, औषधं या सगळ्याबाबत प्रशिक्षित केलं. अगदी आरोग्य तक्त्यापासून सगळं त्यांना शिकवलं. आरोग्य व्यवस्थेचं हे काम या महिलांनी इतकं चांगल केलं की, स्वतःच्या बचतीतून तेथे गावकऱ्यांनी

*गीतस्वर माझे फुलवितिल पाषाण, देतील धरेला दयाघनाचे दान.*

**छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा! प्रायोजक - विश्वकुमार विश्वनाथ आर्किटेक्टस्, प्रा. लि. पुणे.**

आठ हजार स्वच्छतागृहं बांधली.नंतरच्या एका पाहणीत असं दिसून आलं की, यामुळे गावातील मलेरिया ४०% आटोक्यात आला आहे.

❑ **मध्यप्रदेशातील या गावांमध्ये शिक्षणाची व्यवस्था कशी होती?**

साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी मध्यप्रदेश सरकारने 'एज्युकेशन गॅरेंटी स्कीम' सुरू केली. या योजनेमुळे, मुलांच्या पहिली ते पाचवीपर्यंतच्या प्राथमिक शिक्षणाची सोय, समाज आणि सरकार यांनी एकत्रितपणे शाळा उघडून करायची. या शाळांमधील शिक्षकांना सरकार प्रशिक्षण व पगारही देणार. मात्र तेथील समाजाने, या शाळा व्यवस्थितपणे चालण्यासाठी शिक्षकांच्या नेमणुका करणं, वेळ प्रसंगी शिक्षकांना काढून टाकणं याकडे लक्ष पुरवायचं. नोकरी जाईल या भीतीने मग शिक्षकही चांगलं शिकवतात, असा आमचा अनुभव आहे. मध्यप्रदेशात ही योजना खूप यशस्वी झाली आहे. संपूर्ण राज्यात या योजनेच्या वीस हजार नवीन शाळा उघडण्यात आल्या आहेत. या योजनेसाठी या राज्याला 'गोल्डन इनोव्हेशन पुरस्कार' मिळाला आहे. भारतात प्रथमच, एखाद्या राज्य सरकारला हा पुरस्कार देण्यात आला आहे. इतर राज्यांमधेही सरकारपेक्षा समाजाने पुढाकार घेऊन ही योजना सुरू केली पाहिजे.

❑ **महिलांसाठी राखीव जागा असाव्यात की नसाव्यात; यावर तुमचं मत काय आहे?**

ग्रामपंचायत, नगरपालिका इ. स्थानिक पातळीवरील व्यवस्थापनात स्त्रियांना असलेल्या ३३% आरक्षणाचा निश्‍चितच उपयोग आहे, असं मला वाटतं. कारण शिक्षणाचा अभाव, सामाजिक-अर्थिक दर्जा याला वंचित असलेल्या स्त्रीला, त्यामुळे पुढे येण्याची संधी मिळेल. परंतु शिक्षण क्षेत्र, स्पर्धात्मक परीक्षा, नोकऱ्या इ. ठिकाणी आरक्षण नसावं. तिथे मिळणारी संधी ही गुणवत्तेवरच आधारित असली पाहिजे, असं मला वाटंत.

❑ **प्रशासकीय सेवा म्हटलं, की भ्रष्टाचाराचा संबंध येतोच. तुम्हाला असा अनुभव आला आहे का?**

तुमच म्हणणं बरोबर आहे. आजकाल सगळ्याच क्षेत्रात भ्रष्टाचाराचा संबंध येतो. आपलं काम जर पारदर्शी असेल, तर लोकांना तुम्ही नेमकं काय काम करता ते कळतं. लोक आपलं वागणं बघत असतात. तुम्ही तुमची तत्त्वं पाहून, योग्य भूमिकेशी ठाम राहून, प्रामाणिकपणे काम केलं की, लोक तुम्हाला मान देतातच आणि तुम्हाला घाबरतातही, घाबरणं म्हणजे आदरयुक्त भीती. तसंच सहकाऱ्यांच्या चांगल्या कामाचं कौतुक आणि चुकीच्या गोष्टीला शिक्षा देऊन, तुम्ही तुमच्यावर असणारा लोकांचा विश्‍वास सार्थ ठरविला पाहिजे.

**तुमच्या पुढच्या योजनांविषयी थोडंसं...**

दहावीपासूनचं पुढचं शिक्षण माझं पुण्यात झाल्यामुळे, एक वेगळंच नातं आहे. त्यामुळे पुण्यातच स्थायिक व्हायला मला आवडेल. पण अनुभव घेऊन, नवनवीन शिकून आल्यावर, तुमचं घरटं तुम्ही समृद्ध बनवू शकता. माझ्या कामातून मला खूप समाधान मिळतं. या क्षेत्रात खूप संधी आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात नाही तर, भारतात जिथे आव्हानात्मक कामाची संधी मिळेल तिथे काम करायला मला आवडेल.

पुढच्या योजना सांगायच्या तर, महिलांसाठी, विशेषतः ग्रामीण भागातील महिलांसाठी, मला काम करायचंय. भोवतालच्या सामामिक स्थितीमुळे दबल्या गेलेल्या या स्त्रीला मला बाहेर काढायचंय. त्यांना स्वतंत्र्यपणे जगता यावं, यासाठी काही करायचंय!

पुण्याची एक महिला, मध्यप्रदेशात जाऊन, तिथल्या महिलांसाठी काम करतीये, हे ऐकून त्यांचा नक्कीच अभिमान वाटला. परदेशी शिक्षण, नोकरीची संधी असूनही, भारतात राहून काम करण्याच्या त्यांच्या तळमळीतून, तुम्हा मुलांना नक्कीच खूप काही शिकण्यासारखं आहे. स्मिताताईंच्या भावी आकांक्षांना शुभेच्छा देऊन त्यांचा निरोप घेतला.

**कु. स्मिता गाटे**
३/५ शर्मिष्ठा अपार्ट.,
सेनापती बापट रोड,
शिवाजीनगर, पुणे १६

**मुलाखत : सौ. वर्षा तोडमल,**
**सौ. वर्षा कुलकर्णी**

*आता मी पहाड भेदिन, सूर्य पेरीन नसानसात, बनेन आशा नव्या पिढीची, करीन आसमंत कंपायमान*

**श्री. शिरीष पोंक्षे व श्री. प्रसाद पुरंदरे यांच्याकडून प्रबोधकांना हार्दिक शुभेच्छा !**

# मैत्री तुझी-माझी आपली

**प्रा. अनघा कुकडे-लवळेकर**

वृषालीच्या घराचे दिवे दिसायला लागले तेव्हा अनुयानं सायकलची गती थोडी धीमी केली. इतका वेळ जोरजोरात पॅडल मारून ती अगदी घामाघूम झाली होती. आधीच घरातून निघायला जरा उशीरच झालेला नि त्यात वाटेत भेटली वसुमावशी आणि काळेकाका. दोघांनी मिळून तिला जोरदार बौद्धिक पाजलं होतं. त्या वैतागात ती अजूनच रागारागानं पॅडल मारत वृषालीच्या गल्लीपर्यंत येऊन पोचली.'अरेच्या, चांगलाच उशीर झाला, आता ही दोस्तकंपनी चांगलीच पिळणार आपल्याला! कधी नव्हे तो सुधांशुचा वाढदिवस सगळ्यांनी मिळून साजरा करायचा ठरला तर एकेक बिलामत! जाऊ दे!' बेलवर बोट टेकवायच्या आतच दार उघडून निनाद, पुष्पक, सीमा, अनिता सगळे ओरडले, ''हे! पेनल्टी बरंका अनुया आता'' -''काय ग अनु फोन तरी करायचास!'' ''अनुया, अग किती वेळ वाट बघतोय. आम्हाला वाटलं तू आमचा पोपट करणार'' - नुस्ता गदारोळ!

अनुया आत येऊन धपकन खुर्चीवर बसली. ''अरे, हो हो ...किती छळताय! आधीच वसुमावशीनी ज्याम पिडलंय मला. त्यात तुमची काव काव!''काय झालं अनू? का एवढी वैतागलीस?''

अनुयाचा वैतागवाणा चेहरा बघून पुष्करनं तिला पाण्याचा ग्लास आणून दिला. तो घेत अनुया म्हणाली, ''खरं सांगू का, वसुमावशीचा मला मघाशी खूप राग आला होता. पण आता वाटतंय की तिनं मला माझ्या विचारांना पक्कं करायला संधीच दिली !''

''अग पण कसल्या ? ते तरी सांग'' कोरसमधे बाकीचे!

''अग, मी जेव्हा घरातून निघाले ना तेव्हा डोक्यात एकच विषय घोळत होता-सुधांशुचा वाढदिवस. मागच्या वर्षी सुधांशुचे बाबा अपघातामध्ये गेले आणि आईपण सारखी आजारी म्हणून आपण त्याला पाळीपाळीनं अभ्यासात मदत केली आणि आता न्यू टर्मची फी भरायला पैसे कमी पडतात म्हणून हा शहाणा, कॉलेज बंद करून नोकरी करतो म्हणायला लागला , हे तुम्हाला माहीतच आहे''

''ते माहीतीये गं- म्हणून तर आपण आज जमून त्याच्या वाढदिवसानिमित्तानं सगळ्या फीची पावतीच त्याला द्यायची असं ठरालं होतं ना!'' पुष्पक म्हणाला.

''हो ना! अरे इकडे येताना सारखा सुधांशुचा काळजीत बुडालेला चेहरा डोळ्यांपुढे दिसत होता. तेवढ्यात माझी ती वसुमावशी आणि काळे काका भेटले. म्हणजे काय मी तिच्या अंगावर जवळ जवळ धडकणारच होते. तर मला म्हणाली, ''अने, अगं कसली एवढी तंद्री लागलीये तुझी? कुणाचा विचार चाललाय?'' मी एकदम म्हटलं, 'अग सुधांशुचा'' तसं ती जी ओरडली ''कोण हा सुधांशु? काय करतो- कुठं राहतो - आपल्या नात्यात तर कुणी सुधांशु नाहीये- इतका विचार चाललाय की माणसं दिसेनात तुला?'' मी अशी उखडले म्हटलं, ''अगं तो मित्र आहे माझा'' तर अजूनच चिडली ''मित्र! मुलांशी कसली एवढी मैत्री करता? आमच्या वेळी आम्ही मुलांकडे डोळे वर करून बघतसुद्धा नव्हतो!'' मी चिडलेच मग. मी म्हटलं, ''मावशी, तुमची तर मुलींचीच शाळा होती ना पण?'' तर ती अजूनच रागानं म्हणाली, ''म्हणजे काय मुलं नव्हती का आमच्या बाजूला? आम्ही बोलत पण नव्हतो कामाशिवाय, मैत्री कसली करता डोंबलाची? अशानंच तुम्ही फुशारल्यासारख्या वागता आणि नाही नाही ते विचार करता.''

''अगं, खेकसतेस काय अशी तिच्यावर?'' काळे काका म्हणाले, ''हे बघ अनूया - हल्ली मैत्रीच्या नावावर जे काय उलटसुलट ऐकतो ना आम्ही म्हणून काळजी वाटते गं तुमची. परवा माझ्या ऑफिसमधल्या एकांच्या मुलीली तिच्या वर्गातल्या एकांन म्हणे'फ्रेंडशिप देतेस का?' असं विचारल आणि ती नाही म्हणाली तर चक्क भर वर्गात तिच्या थोबाडीत मारली आणि 'बघून घेईन' म्हणाला. तूच सांग, काळजी वाटणार नाही का आम्हाला? मावशी म्हणते त्यात काय चूक आहे बरं?''

''अहो पण काका, आमची काही अशी वरवरची धांगडधिंगा घालणारी मैत्री नाहीये. आमचं अभ्यासमंडळ आहे. सगळे मित्रमैत्रिणी मिळून अभ्यास करतो...'' मी म्हणाले.

''हेच ते- तुमचा अभ्यास, सहली सगळं ओळखून आहे मी. मी म्हणते, मुळात हवेच कशाल मित्र न् बित्र?''

| |
|---|
| मलाच माझे रुप उमजता, मित्र मिळाले सर्व नवे। मी न एकटा माझ्या सोबत, विहंगमांचे भव्य थवे। |

**कॉपी करण्यापेक्षा न करण्याला जास्त शौर्य लागते.**

मावशी ऐकायलाच तयार नव्हती.

''आता सांग! एवढं कचकून भांडण झाल्यावर वैताग नाही का येणार?''

अनिता हे ऐकताना एकदम विचारात गढून गेली. ती म्हणाली, ''अगं होना! माझ्या आजीलासुद्धा आवडत नाही मी मुलांशी मैत्री केलेली. काय रे निनाद तू आर्टस्‌वाला- मानसशास्त्राचा विद्यार्थी ना - तू सांग ना मुलामुलांनी मैत्री करणं खरंच वाईट असंत का रे?''

निनाद एकदम हसून म्हणाला, ''अरे हे काय खूळ आज डोक्यात तुमच्या ? त्यात काय वाईट आहे? जसा पुष्पक माझा जानी दोस्त तशाच तू, सीमा, अनुया जानी मैत्रिणी''

अनिताला राहवेना, ''असं नाही निनाद, पण खरंच मुलामुलींच्या मैत्रीमुळे काय होतं रे, आपण बिघडतो का चांगले होतो? तुम्हाला काय वाटतं सगळ्यांना?''

पुष्पक शांतपणे म्हणाला, ''हे बघ अनिता , आता आपण एकत्र शिकतो, वावरतो, खेळतो - मैत्रीचं नातं तर सहवासातून निर्माण होतं ना -मग ते मुलामुलांत, मुलीमुलींत झालं काय किंवा मुलामुलींत झालं काय किंवा मुलामुलींत झालं काय - काय फरक पडतो?'' ''तुला एक सांगू? माझी आई स्त्रियांच्या समस्या सोडवण्याकरता खूप काम करते'', सीमा मध्येच म्हणाली, ''ती नेहमी मला सांगते, की मुलातल्या क्षमता - मुलांच्या काय मुलींच्या काय सारख्याच असतात. कुणीच कुणापेक्षा श्रेष्ठ नाही- कनिष्‌ ठ नाही, मग बरोबरीच्या लोकांत मैत्रीचं नातं का निर्माण होणार नाही?''

''शिवाय काही काही वेळा आपल्या खास क्षमतांमुळे एकमेकांना मदत करता येते नाही आपल्याला? तुम्ही मुली जास्त भावनाप्रधान असात हे कबूल पण त्यामुळेच सुधांशुचा प्रोब्लेम 'आपला' वाटायला लागला ना आम्हाला. पुष्पक आणि मी जास्त धडपडे आहोत, परवा नाही का ट्रीपला जाताना सीमाची सायकल बिघडली तेव्हा काहीतरी खाटरखुट करून या पुष्पकनं लगेच चालू केली म्हणून आपण वेळेवर जाऊ शकलो? अगं मैत्रीचं मुख्य रहस्य तर एकमेकांच्या क्षमता ओळखून एकमेकांना मदत करण्यातच आहे.'' निनादच्या या बोलण्यावर सीमा, अनिता एकदम ओरडल्या, ''अरे! खरंच की!'' अनुयाही जरा सैलावत बोलली, ''अगदी हाच विचार मघाशी माझ्या मनात येऊन गेला बघ. मैत्री म्हणजे शेवटी एकमेकांना व्यक्ती म्हणून अधिक जाणून घेणं, एकमेकांच्या विश्वासाला पात्र ठरणं आणि तो विश्वास निभावणं! मग त्यात मुलं-मुली असले अडसर हवेतच कशाला?''

इतका वेळ ही सगळी चर्चा ऐकत असलेली वृषाली हातात सरबताचे ग्लास घेऊन आली. सरबत देता देता ती हळूच म्हणाली. ''ए तुम्हाला माझा अनुभव सांगू का?'' हो-सांग ना!'' सगळे एकासुरात ओरडले. ''सुधांशुला आपल्या ग्रुपमध्ये मी आणलं तुम्हाला माहितीये का-त्याची माझी ओळख कशी झाली ते? मी पुस्तकं विकता घ्यायला दुकानात गेले होते ना तेव्हा तो त्याची पुस्तकं सेकंड हॅण्ड विकायला आला होता. मला तीच हवी होती म्हणून मी त्याच्याशी बोलले. त्याच्याकडे सुट्टे नव्हते. तो म्हणाला मी आता घरून आणून देतो. मला वाटंल हा फसवणार, म्हणून मी म्हटलं, 'घर जवळ असेल तर मीच येते.' आम्ही दोघं त्याच्या घरी गेलो.छोटंस घर पण इतकं छान, स्वच्छ होतं! त्यात मला एक चांदीचा कप दिसला. मी विचारलं 'कसला', तर तो म्हणाला, 'मी दहावीला मेरिटमध्ये होतो. दुसऱ्या नंबरवर !' इतका मृदु छान बोलत होता- मी ठरवलंच की आपण मैत्री करायची. मी त्याला माझा पत्ता दिला आणि सांगितलं की आम्ही असं असं अभ्यासमंडळ चालवतो. तू पण ये! तर असा यायला लागला तो आपल्या ग्रुपमध्ये!'' खरंच वृषाली तू जर त्यावेळी त्याची मैत्री वाढवली नसतीस तर आपण सगळेच एका सोन्यासारख्या मित्राला मुकलो असतो, नाही?'' सीमा आवेगानं म्हणाली.

दारावरची बेल वाजली आणि सगळे ओरडले, ''अरे दार उघडंच आहे, आत ये!'' सुधांशु आत आला आणि म्हणाला, ''अरे तुम्ही सगळे जमणार होता का एकत्र? मग मीच बस चुकल्याने उशीरा आलो म्हणायचं.''

पुष्पक हसून म्हणाला. ''सुधांशु तुला आता कधीच उशीर होणार नाही -अभ्यासात आणि रस्त्यावरही. आम्ही मित्र-मैत्रिणींकडून तुझ्या वाढदिवसाची ही सप्रेम भेट!''

सुधांशुच्या एका हातात सायकलची किल्ली आणि दुसऱ्या हातात टर्म फीची रिसीट देत अनुया ओरडली, ''मैत्री झिंदाबाद !'' सगळे कोरसमध्ये पाठोपाठ म्हणाले - ''मैत्री झिंदाबाद !''

**प्रा. अनघा कुकडे-लवळेकर**
'ज्ञानिया', पद्मावती पुणे ९

पृथ्वीवरचे सूर्य होऊनी । लागू आम्ही तळपाया। मित्रत्वाचा हात असू दे। पोटी असू दे माया।

**स्वतःची बुद्धी हीच खरी शक्ती, मग कॉपी करुन बुद्धीची उसनवारी कशाला?**

# गरम चहाची कथा

**श्री. मल्हार अरणकल्ले**

समोर चहाचा अगदी वाफाळलेला कप असला, तर तो तुम्ही पटकन उचलून ओठाला लावता?

नाही, एकमदम दचकू वगैरे नका. ही तुमची उलट तपासणी थोडीच आहे?

काय म्हणालात? तुम्ही असा गरमागरम चहा चटकन घेणाऱ्यांच्याच वर्गातले आहात की काय?

असेनात का बापडे! फक्त एकच करा. असा गरम चहा घेताना होणारी स्वतःची फजिती मात्र कुठे सांगू नका.

तुम्ही म्हणाल, चहा घेताना फजिती ती कसली होणार? आणि अगदी होऊन होऊन काय होईल? चहा सांडेल. कपडे खराब होतील. एखाद्या यजमानांकडे आवर्जून चहापानासाठी गेलेले असू, तर अशा प्रसंगामुळे आपली (आणि आपल्यापेक्षाही खरं म्हणजे यजमानांचीच) अवस्था केविलवाणी होईल...

काय संपल्या कल्पना? काय हो हे! फजिती तर अजून खूप दूरच आहे; पण कल्पनेतल्या फजितीचाही अंदाज नाही ना बांधता येत?

मंडळी, गरम चहाचे महात्म्य काय नव्याने सांगायलो हवे? हा गरमागरम मामला बशीसह उचलून ओठापर्यंत नेणे हीच मोठी कररत असते. पहिला गरम झटका बसतो, तो बशीला स्पर्श केल्यावरच. कारण बहुतेक घरात पाहुण्यांना चहा गरम मिळावा म्हणून, पाहुण्यांचे खाणे होईपर्यंत चहाचे पातेले बशीने झाकून ठेवले जाते. घरात स्टेनलेस स्टीलच्या झाकण्या असल्या, तरी चहाच्या पातेल्यावर बशीच झाकण्याचा प्रघात असतो. सरळ आहे अगदी. हीच बशी कप ठेवून देता येते आणि त्यामुळे झाकणी (म्हणजे तेवढेच एक भांडे) धुवायचे वाचते.

हं, तर मी सांगत होतो की, अशी गरम बशी गरम चहाच्या कपासह उचलून ओठाजवळ नेणे, ही एक कसरत असते. गरमागरम चहा बशीत ओतून पिणे एकदम 'बाळूपणा'चे किंवा मागासलेपणाचे मानले जाते.



चहा बशीत ओतूनच प्यायचा, तर मग तो गरम हवा, हा आग्रह कशाला? म्हणजे तो कपानेच घ्यावा लागतो. या कपाची प्रकृती कशी असते, ते ओठांनाच कळते. स्पर्श होताच पहिला चटका बसतो आणि बशीतला कप हेंदकाळल्याचा आवाज होतो. यजमान काय समजायचे ते समजतो! पण तो पाहुण्यांच्या ते लक्षात येऊ देत नाही. दुसरे म्हणजे, आपल्याला चटका बसून जो किरकोळ अपघात झालेला असतो, तो आपणही यजमानाच्या नजरेपासून लपवायचा प्रयत्न करीत असतो. बहुतेक लोक गरम चहा घेताना डोळे झाकून घेतात, त्यामागील कारण यजमानाची नजर चुकविणे हेच असते. म्हणजे मला चटका बसला आहे, पण 'ठिकाय,ठिकाय' अशा प्रकारचा, असे यजमानांना सांगण्याचा हा एक सहजस्फूर्त प्रकार असतो.

हा गरम चहा जिभेलाही चांगलाच पोळतो; मात्र त्यात एक गडबड होऊन जाते. जिभेला बसलेल्या चटक्यामुळे चहा थोडा अगोड लागतो; आणि आपण अद्याप 'डिक्लेअर्ड डायबेटिक पेशंट' नसल्याने तेही बरे वाटत नाही. आजूबाजूच्या चेहऱ्यांवरही चहाच्या अगोड चवीचे काही दर्शन घडते का? हे हळूच चोरून डोळे उघडून (शाळेतल्या चुकार मुलांच्या प्रार्थनेतल्यासारखे!) पाहावे तर त्यांचेही डोळे बंद; मात्र जिभेचा चटका आणि अगोड चव यांचे दर्शन त्यांनी डोळे कशा प्रकारे मिटलेले आहेत? त्यावरून कळून येते. डोळे अगदी घट्ट, बुब्बुळांत पापण्या ओढून घेऊन मिटले की समजावे, चटका बराच जोराचा असणार आणि

शब्दबद्ध ज्यांची जीवनिंची अनुभूती, वचनी तयांच्या मिळे जीवा विश्रांती.

**कॉपी करण्याची इच्छा म्हणजे आपला आत्मविश्वास हरवल्याचं लक्षण! म्हणूनच कॉपी करू नका!**

त्याच्याच जोडीला जिवणीच्या कडेला रेषांचे दोन-चार ओरखडे दिसले की समजावे, स्वारीला चहा अगोड लागलेला असणार !

अहो, हा चटका काय केवळ जिभेलाच बसून गप्प राहत नाही; तर तो अगदी वर तोंडात, टाळूलाही पकडून ठेवतो. तिथली नाजूकशी कातडी बघा कशी होते ते? नंतर ते चार दिवस पुरते.

पहिला चटका कसाबसा सहन केल्यावर, (खरे म्हणजे आपल्या हाती दुसरे असतेच काय?) पुढील चटके घोटागणिक कोमट होत जातात. ते तेवढे जोरदार भासतही नाहीत. चटका बसलेली जीभ बहुधा तात्पुरती का होईना, चवीची संवेदना हरवून बसते. त्यामुळे चहा अगोड तर लागतोच; पण तो काहीसा कडवटही वाटू लागतो. मग तोंड त्यानुसार अभिनय करू लागते.

पहिले चार-पाच घोट घेतल्यानंतर डोळे उघडून आजूबाजूला पाहायला काहीच हरकत नसते. या वेळी मात्र आपल्याबरोबर चहा घेणाऱ्यांचे चेहरे एकसारखे झालेले दिसतात. परस्परांतली चर्चा तेवढ्यापुरती थांबलेली असते आणि पुन्हा फजिती लपविण्यासाठी मंडळी केवळ ओठांतून हसून संवाद साधतात. त्यातील अगदीच बेरकी असणारा अंगठा आणि त्या शेजारचे बोट यांची टोके जोडून आपण साभिनय सांगून टाकतो, 'झक्कास हं; एकदम फक्कड! (आणि हे बहुधा वहिनींच्या



रोखाने) आणि 'वहिनी ही 'कसचं, कसंच, असे म्हणतात तेही केवळ ठेवणीतल्या हास्याने!

अशा गरम चहा प्राशनाच्या सोहळ्यात एक वेगळीच आफत (सुदैवाने काही साहेबी घरात) कोसळते; ती म्हणजे बिस्किटांची. ही कसरत आणखीच और असते. गरम चहात बुडवलेले बिस्किट पटकन मोडते म्हणा किंवा चहाच्या कपात पडते आणि आपण पुन्हा ही फजिती कोणी पाहिली आहे किंवा कसे? त्याचा नजरेने वेध (आणि शोध) घेत पुढचा बिस्किटचा तुकडा चहात बुडवतो. मग पुन्हा तोच अपघात फिरून घडतो. (असो; तुमचे असे काही झाले असले तरी बिचकू नका. अनेकांचे तसे होत असते. कोणी सांगत नाही इतके!)

असा चहा संपवताना आपल्याला किती संकटांना सामोरे जावे लागते नाही? सगळी फजिती गप्प गिळून (अर्थातच चहाबिस्किटांसह) आपण कपबशी खाली ठेवतो आणि नंतर बहुधा हवापाण्याच्या गप्पांवरच येतो. दांभिकपणा बरे का? कोणी (शास्त्रज्ञ वगळून) त्यावर सहज - म्हणजे घरात वगैरे - बोलू लागला की हमखास समजावे, प्रेम - आस्था हे सारे आटले म्हणूनच हवापाण्याचा विषय आला आहे...

काय मंडळी, केव्हा येता चहाला?

दचकु नका. अवश्य या! फजितीच्या वेळी आपण सारेच डोळे मिटून घेऊ. पहिल्या चटक्याला बसल्यावर मिटतो तसे, अगदी घट्ट!

श्री. मल्हार अरणकल्ले १०/२
गुरूजन सोसायटी, शास्त्रीनगर, पुणे

**प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट अधिनियम ११ बी अन्वये प्रसिद्ध करावयाची माहिती-अर्ज क्र. ४ (नियम ८ प्रमाणे)**

**वृत्तपत्राचे नाव** : छात्र प्रबोधन **प्रसिद्धी काळ** : मासिक

**संपादक, प्रकाशक व मुद्रकाचे**

**नाव पत्ता** : प्रा. महेन्द्र सेठिया, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ३०

**राष्ट्रीयत्व** : भारतीय

**मासिकाची मालकी** : ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ३०.

मी, महेन्द्र सेठिया असे जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे.

*सस्नेह तुमचा*

पुणे,

सौर १० फाल्गुन शके १९२०(१ मार्च १९९०)

*महेन्द्र सेठिया*

चोहीकडे पाहतांना घेसी जसा शोध रे, इथे तिथे चालताना होईल मना बोध रे.

**कॉपी करणे म्हणजे बौद्धिक चोरी होय। तुम्ही चोर नाही ना! मग कॉपी न करण्याचा निश्चय करा!**

# परीक्षेचा बागुलबुवा

**वर्षा तोडमल**



स्नेहसंमेलनाची मजा आता संपली असेल. गुलाबी थंडीत, उबदार पांघरुणात, सूर्य खिडकीतून डोकावेपर्यंत लोळत पडण्याचे दिवसही संपले असतील. घड्याळ्याचे गजर होत असतील, नकळत त्यावर हात पडून पुन्हा त्याची किटकिट बंद होत असेल. पुन्हा पांघरुण ओढून साखर झोपेत स्वप्ने चिवचिवत असतील. पण आईच्या जरबेच्या हाकेतून, या स्वप्नातून तुम्ही वास्तवात उतरत असाल... पण आता हळूहळू उन्हाचा ताप वाढायला लागेल अन् इकडे तुमच्यासाठी, अभ्यासाचा. 'हं... आता मजा पुरे झाली. परीक्षा जवळ आली आहे. अभ्यासाला लाग.'

आईबाबांची करडी नजर आता तुमचा पाठलाग करू लागेल. खेळ बंद... टी व्ही. बंद, उनाडक्या बंद... कारण आता परीक्षांचे दिवस पुढ्यात येऊन ठेपले आहेत, नव्हे अगदी अंगणात उतरले आहेत. काही जणांना अभ्यासाचं स्फुरण चढलं असेल, काही 'चिंतातुर' बनले असतील, तर काहींचा या 'परीक्षादेवीला' प्रसन्न करण्यासाठी झटून अभ्यास करण्यापेक्षा, 'देवा मला पास कर' म्हणण्यातच अधिक वेळ जात असेल.

अरुणा ढेरेंसारख्या कवयित्रीला विद्यार्थी दशेत वाटायचं की, आपल्या घरात पुस्तंक राहतात आणि आपण पुस्तकांनाच सांभाळतो. पुस्तकांच्या ढिंगामध्ये त्यांना भिंतीचा रंगही कधी कळला नाही.

पण मला नेहमी प्रश्न पडतो, की परीक्षेचा एवढा बागुलबुवा कशासाठी? आयुष्याला जर ध्येयाचा किनारा असेल तर परीक्षेची नाव वल्हवत न्यायला अवघड का वाटावं? दूरवर उभं राहून, बारीक डोळे करून, पैलतीर पाहण्यापेक्षा, पाण्यात सूर मारून तो आनंदच का अनुभवायचा नाही? फारतर अपयश येईल. एक-दोनदा येईल, पण अथक परिश्रमानंतर येणाऱ्या अपयशाची गोडी तर चाखायला मिळेल.

इथे मला विवेकानंदांची आठवण होतेय. विवेकानंदांना एकदा एक माणूस म्हणाला, ''मला देवदर्शन पाहिजे.'' विवेकानंदांनी त्याला दुसऱ्या दिवशी बोलावलं व त्या माणसाला पाण्यात बुचकळलं आणि त्याला पाण्याबाहेरच काढेनात. त्या माणसाला श्वास घेता येईना. असं विवेकानंदांनी दोन, तीनदा जीव घाबरा होईपर्यंत, पाण्यातून बुटकळून काढलं. शेवटी तो माणूस म्हणाला, ''पंचाईच झाली, हात जोडतोय. पण आता पुरे झालं.'' शेवटी त्याने विवेकानंदांना विचारलं, ''काय हो स्वामीजी, तुम्ही मला देवदर्शनाची शिकवणूक देणार होतात, ती कुठे दिली?'' विवेकानंद म्हणाले, ''अरे दिली ना! तू आता जे शिकलास तेच देवदर्शनाचे रहस्य आहे. ऑक्सिजनसाठी जसा तुझा जीव व्याकूळ झाला, तसा तू देवासाठी व्याकूळ झाल तर तुलाही देवाचे दर्शन घडेल.''

या कथेतील विवेकानंदांच्या शिष्याला देवदर्शन हव होतं. तुम्हाला परीक्षेतील यश हवंय ना! मग त्या यशाचा असा ध्यास घ्यायचा. यश मिळवायचं तर तीन गोष्टी हव्यात. तुमची बुद्धिमत्ता, तुमचे परिश्रम आणि अगदी थोडासा दैवाचा (आपल्या हातात नसलेला) भाग! आपण पहिल्या दोन गोष्टी विसरतो अन् तिसरीचाच बाऊ करतो. काही मिळवायचं तर त्याच्यासाठी वेडं व्हावं लागतं; ध्यास घ्यावा लागतो. शालेय जीवनातल्या परीक्षा म्हणजे तर, भावी जीवनात अनुभवाव्या लागणाऱ्या अनेक कसोटीच्या प्रसंगांची झलक असते.

कधी अथक् प्रयत्नांनंतर चमचमणारं यश प्राप्त होतं... तो क्षण आपल्या जीवनातला अतिशय आनंदाचा क्षण असतो. पण कधी कधी खूप प्रयत्न करूनही अपेक्षाभंगाचं दुःखसुद्धा भोगावं लागंते. कधी आपल्या क्षमतांवर आपला फाजील विश्वास असतो. यशाची खात्री असते. अशा वेळी

परप्रकाश नकोच, गाजवा तुम्हीही फड, ओळखा स्वतःस आणि सर करा गड।

**परीक्षेत 'गुण'वंत बनण्यासाठी कॉपी करणे टाळा आणि स्वप्रयत्नाने खरेखुरे गुणवंत व्हा.**

अपयश झेलणं कठीण होतं. इतकं की, त्यासाठी आयुष्य पणाला लावायलाही माणसं तयार होतात. क्षणिक निराशेतून आत्महत्येच्या घटना घडताना दिसतात. १० वी, १२ वीच्या परीक्षांच्या निकालानंतर अशा बातम्या वृत्तपत्रांत हमखास वाचायला मिळतात. कमकुवत मनाचंच तर ते लक्षण आहे.

प्रत्येकाची जगण्याची व्याख्या निराळी असते. प्रत्येकाचं आपलं एक ध्येय असतं. या ध्येयपूर्तीच्या मार्गावरून चालताना संकटं आपली परीक्षाच बघत असतात. सामान्य माणूस ठराविक अपयशानंतर खचतो, पण जो येणाऱ्या परीक्षांना जिद्दीनं तोंड देतो, तो सामान्य एक असामान्य इतिहास घडवू शकतो. छत्रपती शिवरायांच्या जन्मापासून ते शेवटच्या क्षणापर्यंत परीक्षांची आणि संकटांची मालिकाच कोसळली.

कान नसणं, हा एडिसनने अडथळा मानला नाही, डोळे नसणं हा सुदासानं अडथळा मानला नाही. लहानपणी तर चर्चिलपासून आइन्स्टाईनपर्यंत, म्हणजे राजकारण्यांपासून शास्त्रज्ञांपर्यंत सर्वांनी अपयश झेललं आहे, तेव्हा कुठे यशश्रीनं त्यांच्या गळ्यात माळ घातली आहे? ज्या क्षणाचं श्रेय त्या क्षणी मिळत नाही? याची जाणीव ठेवून झालेली निंदाही, स्तुती समजून सहन केली, म्हणून त्यांची नावं इतिहासाच्या पानावर कीर्तिरूपाने अजरामर झाली. यशातून उगवलेल्या हिरवळीचा यथेच्छ आनंद लुटण्यासाठी प्रत्येक परीक्षेला आधी जिंकावं लागतं.

कमळाचं सौंदर्य चिखलातून बहरत येतं, पण म्हणून का ते कधी चिखलाचा राग राग करतं? वाळवंटात निवडुंग कसंही उगवतं, म्हणून का ते आपल्या वाकड्या काटेरी रूपावर दुःखी असतं?

व्यक्ती कशीही असो काळी–गोरी, उंच–बुटकी, परीक्षेला तिच्याशी काहीच कर्तव्य नसतं. वर्षामागून वर्ष अन दिवसामागून दिवस जातच असतात. प्रत्येक क्षणाचं आणि संधीचं सोनं आपणच करायला हवं.

**सौ. वर्षा तोडमल**

तोडमल नर्सिंग होम, ३९७ अ, पुणे १.

**ज्ञान प्रबोधिनीद्वारा मे १९९९ च्या सुट्टीतील प्रशिक्षण वर्ग**

(इ. ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी)

१) **स्वयंअध्ययन कौशल्य** (मराठी व इंग्रजी माध्यमांच्या स्वतंत्र तुकड्या)

२) **इंग्रजी संप्रेषण कौशल्य** (फक्त मराठी माध्यम)
(Development of English Communication Skills)

३) **लेखन कौशल्य** (फक्त मराठी माध्यम) वेळ–स.९ ते १२।।

४) **प्रतिभा विकसन वर्ग** (१० मे ते १५ मे व १७ मे ते २२ मे असे फक्त दोनच वर्ग होतील.)

**कालावधी** : वरील प्रत्येक वर्ग सोमवार ते शनिवार, असा एक आठवड्याचा असेल.

**प्रारंभ** : सोम. ३ मे, १० मे, १७ मे, २४ मे, ३१ मे

**शुल्क** : २००/– रु फक्त

**वेळ** : रोज दु. २।। ते ५।।

**स्थळ** : ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ?, पुणे ३०. वरील सर्व वर्गाची नावनोंदणी १ एप्रिल १९९९ पासून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथील चौकशी केंद्रात करावी.

(बाहेरगावच्या विद्यार्थ्यांसाठी निवास व भोजन व्यवस्थेची सोय उपलब्ध नाही.)

**'स्मृती ठेवुनी जाती...'**

*गेल्या महिन्याभरात छात्र प्रबोधनशी निगडित २ तरुण, धडपडणाऱ्या व्यक्ती आपल्याला कायमच्या सोडून गेल्या. दोघांशी परिचय खरं तर अगदी अलिकडचा, पण त्यांच्या कर्तृत्वाने, धडपडीने, प्रबोधिनीवरच्या प्रेमाने खूप जवळचं नातं निर्माण झालं होतं.*

*त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्व सहभागी आहोत.*


* गोव्यातील मडगाव येथील **श्री. सुहास मुळ्ये** (वय ४८) ९५ साली आपल्या संयोजक प्रशिक्षण शिबिरात सहभागी झाले. त्यानंतर मडगावमध्ये विविध प्रासंगिक उपक्रम योजण्यात त्यांचा पुढाकार होता. दिवाळी अंकाचे वितरण केंद्रही त्यांनी सांभाळले होते. मडगावमधील अनेक संस्थांचे ते सक्रीय कार्यकर्ते होते. महाविद्यालयात अत्यंत विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांचा लौकिक होता. ७ फेब्रुवारी ९९ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाले. एका अत्यंत लोभस, मृदुभाषी, अखंड कार्यरत असणाऱ्या आदर्श कार्यकर्त्यांच्या स्मृती, आपल्याला दीर्घकाळ प्रेरणा देत राहतील.

* छात्र प्रबोधनच्या ९८ च्या दिवाळी अंकात 'कर्तृत्वाशी जडले नाते' या लेखमालेतून परिचित झालेले, पारखे पारितोषिक विजेते, तरुण उद्योजक **श्री. समीर गोखले** (वय ३०) यांचे नुकतेच अपघाती निधन झाले. अत्यंत व्यासंगी, प्रयोगशील, असा हा धडाडीचा युवक लिशीतच आपल्याला सोडून गेल्याचे दुःख अधिक आहे. 'मल्चन परफेक्टोरेटर' या त्यांच्या संशोधन रूपाने ते आपल्या स्मृतीत दीर्घकाळ राहतील.

**सर्व प्रबोधकांच्यावतीने दोघांनाही विनम्र श्रद्धांजली!**


जीवनाच्या वाटेवर असलेच जर अटळ संघर्ष, तर जरुर लढा सृजनाच्या बाजूनी!

**कॉपी म्हणजे गुरुजनांचा, आपला स्वतःचा आणि आपल्या आणि विद्येचा अपमान! असा अपमान होऊ देऊ नका!**



**करून तर पाहा** ऊर्जा अक्षय्यतेचा नियम आणि तिचे रूपांतर याचा अभ्यास तुम्ही केला असेल. आपल्या रोजच्या आयुष्यातदेखील अनेकदा ऊर्जेचा वापर केला जातो. 'ऊर्जास्त्रोतांचा योग्य वापर कसा करावा' या विषयावर 'रोटरॅक्ट'पुणे तर्फे आयोजित केलेल्या स्पर्धेत 'ज्ञान प्रबोधिनी प्रशाले'च्या इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी ही प्रतिकृती केली होती. तिला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

## हायड्रोमेकॅनिकल व पवनऊर्जा वापरून बनवलेले कापण्याचे यंत्र




हे यंत्र पाण्याच्या प्रवाहामुळे व वाऱ्याच्या प्रवाहामुळे चालते. पाण्याच्या प्रवाहामुळे 'टरबाईन' तरवाऱ्याच्या प्रवाहामुळे चक्र फिरते.

**साधन** : डबा, छोटी नळी, कटर, लांब दांडा, एक छोटा व एक मोठा पंखा.

**कृती** : १. डब्याला वरून नळीचे तोंड बाहेर येईल एवढे भोक पाडावे. जेणे करून वरून पडणारे पाणी त्यातून वाहून जाईल. ३. डब्याच्या आरपार दांडा जाईल असे मधोमध भोक पाडावे. ४. दांडा डब्यात आरपार घालून, दांड्याच्या मधे छोटा पंखा लावावा, पंखा डब्याच्या आत असला पाहिजे. दांड्याच्या बाहेर कटर व दांड्याच्या टोकाला मोठा पंखा लावावा. ५. डब्याला पाडलेल्या वरील भोकातून नळी आत टाकताना त्यातून आलेले पाणी छोट्या पंख्यावर पडेल व पंखा फिरेल ह्याची काळजी घ्यावी. ६. नळीतून जोरात पाणी सोड़ावे व मोठ्या पंख्याच्या समोर फॅन धरावा, कटर फिरायला लागेल. कटरसमोर कागद धरावा; कागद कापला जाईल.

**टीप** : दोन्ही पंख्यांच्या पाती थोड्या वाकवा. ज्यामुळे पंखे नीट फिरतील.

वरील उपकरण ऊर्जा अक्षय्यतेच्या नियमावर अवलंबून आहे.

१. उंचावर असलेले पाणी जेव्हा खाल़च्या दिशेने वाहू लागते. तेव्हा त्यातील स्थितिज ऊर्जेचे रूपांतर गतिज ऊर्जेमध्ये होते वाहत्या पाण्यातील गतिज ऊर्जेचा वापर चक्र फिरविण्यासाठी होतो व त्याचे रूपांतर यांत्रिक ऊर्जेमध्ये होते

२. जेव्हा पवन ऊर्जेचा वापर होतो, तेथे वाऱ्याच्या यांत्रिक ऊर्जेचा वापर यंत्र चालविण्यासाठी होतो.

**उपयोग** : शेतात विहिरीतून पंपाने काढलेले पाणी शेतात सोडताना ह्या पाण्याला वेग असतो; हा वेग व शेतावार असेल तर वाऱ्याचा वेग वापरून कडबा, पिकं ह्यांची कापणी करता येईल.


**कुणाल महाजन, केदार करमरकर, विनायक जोशी, पराग जोशी, तेजस पोळ**


प्रयोगाविण तत्त्वज्ञ हा, जणू वृक्ष निष्फळ, भक्त जो शिक्षणाविण, निर्द्वार गृह केवळ.

**कॉपीसारखी अपवित्र आणि विकृत कृती कराल तर आयुष्यभर लबाडीनेच वागाल! म्हणून कॉपी करू नका.**

# 'मावशीचा विजय असो!'

सुहासिनी देशपांडे

मुलांना धाकटी मावशी खूप आवडते. कारण ती मुलांच्यात रमते. त्यांच्याशी बरोबरीच्या नात्यानं वागते.

एरवी आजी-आजोबा, काका-काकू, मामा-मामी, आई-बाबा, अशी काही मोठी माणसं नि मुलं यांच्यात मोठीच दरी असते.

म्हणजे असं की, दरडावणं, रागावणं, प्रेम करणं, काही आणून देणं हे सारं करताना आम्ही 'मोठी' माणसं आमच्या मर्जीनुसार करतो.

मोठा आठवीत आहे. पण त्याला स्पर्शातून लाड हवे असतात. लाडात आला की 'कुशीत घे', 'जवळ घे', 'थोपट' अशा त्याच्या मागण्या सुरू होतात. त्यावेळी माझी मर्जी नसेल तर मी चटकन् त्याला दूर करते. 'हो तिकडंऽ' मात्र माझी 'मूड' असेल तर 'दादुटल्या, सोनी ग ती! ... टिंगू ...चिंगू' करून मी त्याला कुरवाळते. अर्थात् त्यावेळी तो जीम कॉर्बेटची 'कुमाउंचे नरभक्षक' किंवा शंकराराव खरातांचे 'तराळ-अंतराळ' वाचण्यात गर्क झालेला असतो!

-पण धाकट्या मावशीचं तसं नाही. ती त्याच्या गमती-जमती ऐकून घेते, त्याने सांगितलेल्या जोकस्ना खळखळून हसून दाद देते.

'दादू, फाऽर आहे हे! त्याला सेन्स ऑफ ह्यूमर चांगलाच आहे हं!' किंवा

'वा! मुन्नु, अगदी युक्तिबाज आहेस हं!' अशी दिलखुलास पावतीही देते.

- 'मावशी, चल नं, माझी नर्सरी दाखवतो तुला.'

-मावशी उत्साहानं त्याची नर्सरी बघायला गच्चीवर जाते.

त्याच्याबरोबर त्याची चिमुकली बाग रस घेऊन बघते. त्याच्या गुलाबाला फुटलेल्या स्प्राऊटचं कौतुक करते, दुधाच्या पिशव्यांमध्ये त्यानं लावलेल्या पांगाऱ्याच्या बियांचंही तिला अप्रूप वाटतं. एखादा कॅक्टस ती त्याच्या परवानगीनं मागून घेते. त्याला द्यायच्या खत-पाण्याची, साऱ्याची चौकशी करते.

दादाच्या ज्या गोष्टीत आईला रस नसतो, दादाच्या फुलझाडांच्या ज्या गप्पा आईला रटाळ आणि 'पुरे कर रे बाबा' अशा वाटतात, त्यात धाकट्या मावशीला इतका 'इंटरेस्ट' असल्याचे पाहून छोट्याला पण खुमखुमी येते.

'मावशी, आमच्या राजीव सरांनी सांगितलेली गोष्ट सांगू?' यांना शिकवायला सुद्धा राजीवसर, कविताताई, शीलाताई, अशी मंडळी असतात. आमच्या काळचे मारकुटे झांझरे मास्तर आणि तापट होनराव बाई यावेळी मला आठवतात!

तोपर्यंत मुन्नाची राजीव सरांनी सांगितलेली 'द फॅण्टास्टिक व्हॉएज'ही प्रदीर्घ विज्ञानकथा रंगात आलेली असते आणि मावशी आपलं सगळं चित्त त्या गोष्टीत देऊन ती ऐकत असते. मधूनच 'बापरे! मग पुढं काय? एका तासात करतात का ती व्हॉएज पूर्ण? डोळ्यातील पाण्यातून बाहेर येतात ते?' असं कुतुलही दर्शवत असते.

'किती फॅण्टास्टिक ना? ताईला ऐकवलीस का ही गोष्ट? केवढी थरारक ना?'

''आईला? आईला वेळ तरी असतो का? सकाळी सांगितली तर म्हणते, घाईच्यावेळेला नको रे ! रात्री सांगायला गेलो तर 'दमले रे बाबा' म्हणून झोपून गेली.'' पाचवीतला मुन्ना माझी नक्कल करत मावशीला सांगतो.

खरंच, त्याची ही गोष्ट ऐकली- म्हणजे त्यानं सांगितली खरी, पण मला काही 'लिंक'लागू शकली नाही. मधेच फोडणी करपेल, अजून पोळ्या व्हायच्यात...यांचा डबा.. माझ्या शाळेची कामं या गोष्टींचीच गर्दी झाली होती.

रात्री तो गोष्ट सांगत होता तेव्हा मिळालेला पेपर वाचत होते. त्याच्या समजुतीसाठी मधुनच हुंकार भरत होते. 'हं हं! करताना कधी डोळे

*आकाशाचे मन कळत नाही, वारा होऊन मुक्त झाल्याशिवाय! आईचेही मन कळत नाही, तिच्या अंतःकरणात शिल्याशिवाय.*

**स्वतःशी प्रामाणिक राहणं हाचं करा सत्धर्म होय; म्हणूनच कापी करणे हा नैतिक गुन्हा आहे.**

मिटले कळलंच नाही.

पोस्ट-ग्रॅज्युएशन नंतर मावशीनं दोन वर्ष संघटनेला पूर्णवेळ द्यायचं ठरवलं निर्धारानं दिलीही. दोन वर्ष ती नाशिकमधे संघटनेचं काम करीत होती. तेथून तिची पत्रं येत, ती मुलांच्या नावांन अधिक वेळा असत. दिवाळीचं, नूतन वर्षाचं किंवा संक्रांतीचं भेटकार्ड येई ते मुलांच्या नावानं, त्यांना भावेल असं... बरेचदा कार्ड तिनं बनवलेलं असे, त्यातही विविध गमती-जमती असत. कधी पेन्सिलीचं टोक करताना निघालेल्या शकलांची नक्षीदार फुले असत, पंच केल्यानंतर पडलेल्या कागदी टिकल्यांची सजावट असे. एखाद्या भेटकार्डाचा आकार घराचा असे अन् त्या घराचं दार उघडलं की, शुभेच्छा देणाऱ्या मावशीचं कार्टून असे...कितीतरी मजा!

दिवाळीची भेटवस्तू म्हणजे खूप चित्रं असलेली गोष्टींची पुस्तकं.

संघटनेसाठी ठरल्याप्रमाणे दोन वर्ष दिल्यानंतर मावशीनं कॉलेजमध्ये लेक्चरची नोकरी स्वीकारली.

या वर्षीची दिवाळी आता दणकेबाज. सगळ्या भाचे कंपनीला काय हवं ते प्रेझेंट मिळणार आपल्या कमाईतनं. मावशीनं एकदम जाहीर करून टाकलं.

सगळ्या बच्ची कंपनीनं सुंदर फ्रॉक्स, पंजाबी सूट, किंवा कानातलं, गळ्यातलं, बांगड्या मागितल्या. त्यांना ते मिळालं.

ही दोघे एकमेकांच्या कानाला लागली. कधी नव्हे ते दोघांचं एकमत झालं!

'मावशी, आम्ही मागू ते देशील? बघ हं! वचन दे!'

मावशी पोट धरधरूच हसली. म्हणाली, 'मागा तर खरं! वचन कसं आधी देऊ? माझ्या बजेटमध्ये हवं!'

'तुझ्या बजेटमध्ये बसेल. पण मोठ्ठी अडचण आहे! त्यासाठी आम्हाला तुझी मदत हवीय!'

'असं काय तुम्ही मागणार आहात, कळत नाही!'

'मावशी, आम्हाला छानसं कुत्रं दे तु; दिवाळीची भेट म्हणून!'

'हात् तिच्या! एवढचं होय!'

मग मावशी नि भाचे जमिनीवर पेपर पसरून छोट्या जाहिराती धुंडाळू लागले. 'विकणे आहे...'

भराभरा फोनही फिरत होते. मुलांच्या उत्साहाला उधाण आलं होतं. कुत्रं ठेवायचं कुठं? त्याला खायला काय घालायचं? त्याला कोणत्या करामती शिकवायच्या...जणू कुत्रं घरात येऊन दाखलच झालं होतं! एवढ्या सगळ्या फोनमधनं एका ठिकाणी अपॉइंटमेंट ठरली.

'चला कपडे करा. आपण जाऊन येऊ या. फार लाबं नाहीय. डेक्कन जिमखान्यापर्यंत बस मिळेल. -पुढे थोडं शोधत हिंडावं लागेल'

मावशीच्या बरोबर हे आणखी एक चांगलं असतं. मुलं बिनतक्रार जातात, चालतात. कारण वेळ कसा गेला ते कळत नाही नि बोअर होत नाही, असं त्यांचं म्हणणं! (म्हणजे) आमच्याबरोबर बोअर होतं हं!)

'इऽयाऽऽ ! दादाऽ... कुत्रं आणायचं! त्याचं नाव काय ठेवू या?' मुन्नूला, आनंद कसा व्यक्त करावं ते कळलं नाही की तो असा आरडा ओरडा करतो ईऽयाऽऽ

मग नावाची चर्चा होते.

'अरे, कुत्रा बघितल्याशिवाय कसं नाव ठेवणारं? तुम्ही पुल्लींग नाव शोधाल आणि कुत्री असली तर?'

'खरंच की? आपण व्हाईटी नाव ठेवलं न् निघालं ब्लॅकी तर?'

'एऽऽ पण आई?... मावशी, आता आईची परवानगी तूच घे बुवा!'



कधी कधी भावनांना वाव द्यावा, आसुसलेल्या डोळ्यांना स्वप्नांचा गाव द्यावा.

**कॉपी करणे म्हणजे शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराच होय! त्याला आळा घालणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.**

'का बरं?
'आईला नाही आवडत कुत्रं पाळलेलं.'
मासिक वाचता वाचता मी हे सारं काही बराच वेळ ऐकत होते. पण मावशी सारं हाताळतेय म्हटल्यावर मी त्यात हस्तक्षेप केला नव्हता.
माझ्याकडं विषय येताच मी माझ्या पद्धतीनं एकदम अडसर घातला–
'मुळीच नाही. कुत्रा बित्रा काही नाही. त्याची घाण कोण काढणार? त्याला खायला मास मटण लागेल, ते कोण आणणार? दिवसभर घरात त्याच्याकडे कोण पाहणार?'
मी रोखठोक मुद्दे काढले आणि प्रस्ताव फेटाळून लावला.
'अगं, आम्ही करू! तुला नाही करायला लावणार!' मुलांनी आर्जवं केली. किती गयावया केली. पण माझा निर्णय ठाम होता. खरं तर मधूनच मला वाटत होतं – काय हरकत आहे? देऊन टाकावी परवानगी?
पण नाही म्हणजे नाही! मला कुत्री–माजंर आवडत नाहीत. म्हणून परवानगी नाही! बस्स!
मुलं हिरमुसली! म्हणून काय झालं? विसरतील लवकरच!
मावशीनं काय समजूत घातली कोण जाणे!
सकाळी दहा वाजता मामाची मुलं आली.
'आत्या, दादाभाईसाठी कुत्रं आणायला जायचं ना?' आल्या आल्या त्यानं मावशीला (म्हणजे त्यांच्या धाकट्या आत्याला) विचारलं.
'नाही. आई आणू देत नाही. असं सांगताना थोरल्याच्या आवाजात नाराजी आणि खेद भरलेला होता.
धाकट्या मावशीनं मग सर्व भाचे मंडळींना बरोबर नेलं. दिवसभर मुलं भटकत असावीत. संध्याकाळी दाराशी रिक्षा थांबली. मावशी खाली उतरली. तिच्या हातात काचेची पेटी होती. थोरल्याच्या हातात माशांची पिवशी होती.
साऱ्या सूचनाबरहुकूम मावशी मुलांना ॲक्वेरियम समजवून देत होती. समजवून देत होती म्हणण्यापेक्षा मुलंच समजवत होती. नि मावशी त्यांना लागेल ती मदत करीत होती. ती तटस्थपणे बघत होती.
पाहता पाहता ॲक्वेरियममधल्या स्वच्छ नितळ पाण्यात सोनेरी, चंदेरी काळे, नारंगी मासे सुळकन् उतरले! काचेच्या ॲक्वेरियमच्या पेटीत चैतन्य आलं. पाणवनस्पतींचा हिरवा कृत्रिम निसर्ग आत नटला. त्याच्या सोबतीनं मासे इकडून तिकडे, तिकडून इकडे सुळकन् फिरायला, खेळायला लागले.
मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद, कोणत्या शब्दांत वर्णन करायचा? सकाळचं हिरमुसलेपण त्यांच्या चेहऱ्यावर इतकं देखील नव्हतं.
मला मात्र थोड्या वेळानं अश्वत्थाम्याच्या आईचा 'गिल्टी कॉन्शस' सतवायला लागला. मुलांना कुत्रं आणून दिलं असतं तर त्यांच्या प्रेमाला तितकाच उत्कट प्रतिसाद मिळाला असता. माशाचं काय कौतुक? सारा एकतर्फी मामला. पाणी बदला, खायला घाला... पण म्हणून काय त्या प्रेमाला ते प्रतिसाद थोडेच देऊ शकणार?
खरं तर, मी शाळेत शिक्षिका आहे. माझ्या मुलांच्या वयाच्या, मुलांच्या मानसिक गरजा काय आहेत? हे मी ओळखायला हवं होतं. या वयात, माशापेक्षा कुत्र्यासारखा प्राणी जीवाभावाचा दोस्त म्हणून योग्य राहिला असता. चुकलंच आपलं.
'हंऽ! दादू मुन्नू! आता या माशाची छान काळजी घ्या. वरचेवर पेटीतलं पाणी बदलायचं, माशांना वेळच्या वेळी या आळ्या खायला घालायच्या. जर वर्षभर जबाबदीरीनं तुम्ही माशांना सांभाळलंत तर पुढच्या दिवाळीला मस्त पॉमेरियन कुत्रा आणू या? चालेल नं ताई? वर्षभरात त्यांना आपली जबाबदारी कळेल. होय ना दादू?' मावशी निघता निघता म्हणाली.
मी हळूच म्हटलं – 'वर्षानं कशाला? उद्याच घेऊन या तुमच्या पसंतीचा कुत्रा!'
'ईऽऽया'
'याऽऽयाऽऽ'
मुलांनी आनंदानं आरोळ्या ठोकल्या इतका वेळ खुर्चीत शांतपणे पेपर वाचत बसलेल्या मुलांच्या बाबांनी पेपरच्या आडून मिष्किलपणे पाहात म्हटलं–
'मावशीचा विजय असो!'

सौ. सुहासिनी देशपांडे
३ पुण्यश्री अपार्टमेंट, डहाणूकर कॉलनी,
रस्ता क्र ७, कोथरूड पुणे २९

आनंदाच्या स्वरात भिजला आनंदी अर्थ। आनंदाच्या सुरावटीवर आनंदी गीत।

**काळासंगे धावण्यासाठी धरावी विज्ञानाची कास, सभासद होऊन छात्र प्रबोधनचे मिळतो हा विश्वास।**

## ५ ठिकाणच्या उपक्रम-केंद्रांना ज्ञान प्रबोधिनीच्या संचालकांच्या भेटी

ज्ञान प्रबोधिनीचे कार्य शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, आरोग्य संघटन, प्रशिक्षण व उत्पादन अशा विविध क्षेत्रांमध्ये अनेक विभागांतर्फे चालू आहे. छात्र प्रबोधन हा त्यापैकीच एक विभाग! या सर्व कार्याच्या केंद्रस्थानी असलेली व्यक्ती म्हणजे ज्ञान प्रबोधिनीचे संचालक. त्यांची दरवर्षी या सर्व विभागांना वार्षिक भेट असते. त्यामध्ये त्या त्या ठिकाणचे कार्य जवळून पाहणे, तेथील कार्यकर्त्याबरोबर पुढील कामासंबंधी चिंतन करणे, असा प्रमुख भाग असतो.

छात्र प्रबोधन मासिकाच्या माध्यमातून ठिकठिकाणी विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम चालू आहेत. अशा ५ उपक्रम-केंद्रांना गेल्या महिन्याभरात आदरणीय संचालकांनी भेटी दिल्या. त्यापैकी सांगली, इचलकरंजी, डोंबिवली व बोरविली येथे वर्षभर उपक्रमांना नियमित येणाऱ्या विद्यार्थ्यांनी नित्याचे कार्यक्रम सादर केले व वर्षभर काय काय शिकलो ते निवेदनांमधून सांगितले. त्यानंतर कार्यकर्त्यांची बैठक झाली व संध्याकाळी पालक-शिक्षक-युवा कार्यकर्त्यांसाठी आदरणीय संचालक विद्यावाचस्पती (डॉ.) गिरीशराव बापट यांचे ''एकविसाव्या शतकातील व्यक्तिमत्त्व विकसनाच्या संकल्पना'' या विषयावर विचार करायला लावणारे, सुरेख असे व्याख्यान झाले. सर्व ठिकाणी विद्यार्थी- कार्यकर्ते यांचा उत्साह विशेष होता. तसेच व्याख्यानांनाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अलिबाग येथे दिवसभर स्थानिक व परिसरातील (नागोठणे, रसायनी, किहीम,इ.) सुमारे ३५ कार्यकर्त्यांचे एक शिबिर झाले व संध्याकाळी स्नेहमेळाव्याचा कार्यक्राम होता; त्यामध्ये ज्ञान प्रबोधिनीच्या सर्व विभागांचे एकत्र असे प्रदर्शन मांडण्यात आले होते. विविध क्षेत्रातील मान्यवर, हितचिंतक असे सुमारे १०० जण या अनौपचारिक स्नेहमेळाव्याच्या कार्यक्रमास येऊन गेले. मान्यवर संचालक दिवसभर या कार्यक्रमास उपस्थित होते.

सांगली येथे १४ फेब्रुवारी रोजी दिवसभराचा अभ्यास मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्यात आला. त्यामध्ये ३० विद्यार्थी सहभागी झाले. सकाळी ९ ते संध्या. ५ इतका वेळ विद्यार्थ्यांनी अभ्यासाची विविध तंत्रे समजावून घेत त्याचा सराव केला. पुण्याहून प्रा. विवेक पोंक्षे मार्गदर्शन करण्यासाठी तेथे गेले होते. पुढील महिनाभर नित्य साप्ताहिक कार्यक्रमाबरोबरच अभ्यासिकेच्या माध्यमातून या तंत्रांचा पाठपुरावा केला जाईल.

**एप्रिल-मे महिन्यात घ्यावयाचा कार्यक्रम :** या वर्षीच्या सुट्ट्यांमध्ये विद्यार्थ्यांकडून विविध विषयांवरील प्रकल्प आपण करून घ्यावे. खाली काही प्रकल्पांचे विषय सुचवत आहे. त्यापैकी अथवा त्याशिवायही अन्य विषयांवर छोट्या छोट्या गटांमध्ये विद्यार्थ्यांकडून आपण प्रकल्प करून घेऊ शकाल. त्यामधून प्रामुख्याने विविध ठिकाणांहून माहिती कशी गोळा करायची? ती एकत्र कशी करायची? त्याचे वर्गीकरण कसे करायचे? ती सादर कशी करायची? त्यातून निष्कर्ष कसे काढायचे? इ. कौशल्ये विद्यार्थ्यांनी शिकावीत, त्यांचा आत्मविश्वास वाढावा, व्यावहारिक जगाशी त्यांची ओळख व्हावी, अशी अपेक्षा आहे. प्रकल्प कसे करून घ्यावेत? याबाबत अधिक तपशील हवे असल्यास,ज्ञान प्रबोधिनीद्वारा प्रकाशित'नावीन्यपूर्ण प्रकल्प कसे करावेत?'हे पुस्तक वाचावे. प्रकल्प करताना मुलांना मजा वाटली पाहिजे, आव्हान वाटले पाहिजे, अशा रितीने विषयांची व गटाची निवड करावी. मुलांनीच प्रकल्पाचे नियोजन करावे. ठिकठिकाणी जाऊन माहिती मिळवावी; संबंधित व्यक्तिंच्या मुलाखती घ्याव्यात.

रोज किंवा २-३ दिवसांतून एकदा, एकत्र जमून प्रकल्पाच्या कामाबाबत काय काय झाले? हे विचारावे. मुले जिथे कमी पडतील तेथे योग्य ते मार्गदर्शन, साहाय्य करावे. शक्य झाल्यास अशा प्रकल्पांचे एक छोटेसे प्रदर्शनही मांडावे व परिसरातील विद्यार्थी-पालक-शिक्षक यांना त्यासाठी आवर्जून बोलवावे.

**प्रकल्पांचे काही विषय :**

**१.** आपल्या गावात मिळणाऱ्या भाज्यांची माहिती एकत्र करणे.**२.** आपल्या गावातील/परिसरातील किमान ५० वृक्षांची माहिती मिळविणे.**३.** आपल्या गावातील महत्त्वाच्या चौकांमधून संध्याकाळच्या वेळात (३ तासात) किती वाहने जातात ह्याची नोंद करून त्या आधारे धूर व प्रदुषणासंबंधी टिपण तयार करणे.**४.**वीज व पाणी पुरवठ्याच्या आपल्या गावातील यंत्रणेचा सविस्तर अभ्यास करून गावाची गरज, पुरवठ्यातील अडथळे इ. बाबत विस्तृत माहिती मिळविणे.**६.** गावातील ५० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या २० व्यक्तींना भेटून गावाचा गेल्या ५० वर्षांचा इतिहास, झालेले बदल इ. लिहून काढणे.(शक्य तेथे चित्र काढणे, प्रकाशचित्रे काढणे-मिळविणे इ. आवर्जून करावे)

कवेत घेऊ इंद्रधनूला स्वप्न मनी जागवू, दिशादिशांनी क्षितिजावरती गाणे घुमवित जाऊ.

**गाणं म्हणत जगण्यासाठी अन् फुलासारखं फुलण्यासाठी... हवं छात्र प्रबोधन हाती.**

**शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिर** : ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या वतीने जूनच्या पहिल्या - दुसऱ्या आठवड्यात शिक्षकांसाठी ६ दिवसांचे निवासी शिबिर पुण्यामध्ये योजण्यात येणार आहे. या शिबिरात शाळेतील तीन शिक्षक व दोन विद्यार्थी यांनी एकत्रिपणे, शाळेचे मुख्याध्यापक व संस्थेचे पदाधिकारी यांच्या संमतीने सहभागी होणे अपेक्षित आहे. एकेकट्या शिक्षकांना स्वतंत्रपणे, या शिबिरात सहभागी होता येणार नाही.

ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण प्रक्रियेतून विकसित झालेल्या खालील ४ गोष्टींचे प्रशिक्षण या शिबिरात दिले जाणार आहे.

१. वाचन कौशल्य २. स्वयं -अध्ययन कौशल्य ३. बरची नृत्य ४. विद्याव्रत संस्कार.

शिबिराचा आशय, शुल्क, तांत्रिक व्यवस्था इ. बाबतच्या सविस्तर माहितीसाठी खालील पत्त्यावर संपर्क करावा.

यापूर्वी गेली २ वर्षे अशी शिबिरे योजण्यात आली असून त्यामध्ये १७ शाळांमधील ५० शिक्षक सहभागी झाले होते. शिबिराचा वर्षभर पाठपुरावा करण्यात येतो. तसेच आवश्यक ते साहित्यही दिले जाते.

शिक्षण क्षेत्रात उत्साहपूर्ण व काळाशी सुसंगत बदल घडवून आणण्यासाठी या शिबिरात अवश्य सहभागी व्हा!

संपर्क पत्ता : प्रकल्पधिकारी, ज्ञान प्रबोधिनी, शैक्षणिक उपक्रम संशोधिका, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

## नेतृत्व प्रशिक्षण शिबिर

**कालावधी** : मुलांसाठी : १३ मे ते २० मे ९९
मुलींसाठी : २३ मे ते २९ मे ९९
**(मुलींच्या शिबिरातील कालावधीमधला बदल लक्षात घ्यावा)**
**वयोगट** : इ. ९ वी ते पदवीपर्यंत
**शिबिर स्थळ** : पुणे
**शुल्क** : रु ४००/-

**सर्वसाधरण कार्यक्रम** : पहिले ४ दिवस नेतृत्वासाठी आवश्यक विविध कौशल्यांचे अनुभवांधून प्रशिक्षण, चर्चा, अनुभवकथन इ. पुढचे २ दिवस जवळपासच्या ग्रामीण भागातील मुलामुलींचे शिबिर घेण्याचा अमुभव. छोटी सहल व समारोप. शिबिर पूर्णतः निवासी असेल.

हे शिबिर सर्वसाधारण व्यक्तिमत्त्व विकसन शिबिर नाही. ज्यांना नेतृत्व करण्याची हौस व इच्छा आहे; त्यातील गुणवत्ता व कौशल्य विकसित करण्यासाठी शिकण्याची, कष्ट करण्याची, स्वतःमध्ये आवश्यक ते बदल करण्याची ज्यांची मनापासून तयारी आहे, अशांनी या शिबिरात आवर्जून सहभागी होण्यावूर्वी ३ गृहपाठ (तपशील यापूर्वीच्या अंकात पाहावेत.) पूर्ण करून येणे व मासिकाचे सभासद असणे आवश्यक आहे. शिबिराचे माहितीपत्रक व नोंदणीपत्रक स्थानिक व मुख्य कार्यालयात उपलब्ध आहेत. लवकरात लवकर शुल्क भरून आपली नावानिश्चिती करावी.

(शिबिराचे शुल्क भरण्यात कोणाला आर्थिक अडचण असल्यास त्यांनी सवलतीसाठी पत्रव्यवहार करावा.)

**भारताच्या उज्ज्वल भवितव्यासाठी चारित्र्यसंपन्न व कर्तृत्वसंपन्न नेत्यांची गरज आपण भरून काढायला हवी. त्यासाठी नेतृत्व प्रशिक्षण शिबिरात सहभागी व्हा!**

## संयोजक प्रशिक्षण शिबिर

**कालावधी** : १५ ते १९ एप्रिल १९९९
**वयोगट** : २५ वर्ष व पुढील
**शिबिर स्थळ** : पुणे
**शिबिर शुल्क** : रु २५०/-

आपापल्या गावात ज्ञान प्रबोधिनीतर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनासाठी कार्यक्रम योजण्याची ज्यांना इच्छा आहे व त्यासाठी आठवड्यातून किमान ३-४ तास स्वयंसेवी वृत्तीने काम करण्याची ज्यांची तयारी आहे अशांसाठी हे शिबिर आहे.

आपल्या गावात कोणत्या स्वरूपाचे कार्यक्रम योजावेत, त्याच्यामागची भूमिका, प्रबोधिनीचे अनुभव व विचार इ. ची माहिती घेणे व त्यासाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण घेणे, हा या शिबिरातील मुख्य भाग असेल.

शिबिर निवासी असून, शिबिरात पूर्णवेळ सहभागी होणे आवश्यक!

शिबिरात सहभागी होण्यासाठी '**विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकसनाच्या माझ्या कल्पना**'या विषयावर सुमारे ५०० शब्दांपर्यंतचा निबंध लिहून छात्र प्रबोधनच्या पत्त्यावर पाठविणे आवश्यक आहे.

शिबिराचे माहितीपत्रक व नोंदणीपत्रक स्थानिक व मुख्य कार्यालयात उपलब्ध आहेत.

लवकरात लवकर शुल्क भरून आपले नाव निश्चित करावे. **भारताची भावी पिढी कर्तृत्वसंपन्न व संस्कारपूर्ण व्हावी यासाठी आपणही आपला वेळ शक्ती या कामासाठी वेचली पाहिजे. त्याचा उपयोग अधिक नेटकेपणाने कसा करता येईल? हे जाणून घेण्यासाठी या शिबिरात आवर्जून सहभागी व्हा!**

नोंदणी क्रमांक : PHM/22VIII/1997, टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन; PNCW/349, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र.- L 128

# 'माणूस' सुंदर घडवू या!

श्वास मोकळा घेऊनिया मज मुक्तीचे गीत गाऊ द्या।
बंध कोणते मानायाचे माझे मजला ठरवू द्या॥

तेजस्विनींच्या कथा आठवुनि जोम झगडण्या मिळवूया।
'मी'पण अपुले जपता जपता ताठ कणा ही उभवूया॥

मुक्तीसाठी लढता लढता कोमलता नच हरवूया।
माता, भगिनी, कन्या, कांता या रुपांना फुलवूया॥

समतेचे पंख लेवूनी घेऊ भरारी गगनीया।
ऋजुता जपण्या मनातली पण सौहार्दाचा हात हवा॥

शब्द कोवळा, भाव कोवळा विचार दृढ परि ठेवूया।
कर्तृत्वाच्या साक्षीने अन् 'माणूस' सुंदर घडवू या॥



**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे 411030. ☎ (०२०) ४७७६९१/४७८०९५
**कार्यालयाची वेळ** : स. १० ते संध्या. ७
**किंमत** : रु. १०/-
**वार्षिक वर्गणी** : रुपये १२५/-
**प्रकाशन दिनांक** : सौर १० फाल्गुन, शके १९२०
१ मार्च १९९९